मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ४० ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर १९९८

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

प्रासंगिक

## या युवकांना झालंय तरी काय?

***वेंगुर्ले येथील कलामहाविद्यालयात ११वीत शिकणाऱ्या शशांक श्रीधर (पृ. ३९६) याचे हे विचार तरुणांनाच नव्हे तर त्यांच्या आई-वडिलांनाहि विचार करायला लावणारे आहेत. वाचकांनी विशेषत: युवक-युवतींनी याबाबतचे आपले विचार हितगुजमधे प्रसिद्धीसाठी जरूर पाठवावे. - संपादक***

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणविणाऱ्या पुणे शहरात घडलेली घटना. महाविद्यालयीन विद्यार्थिनी नीता हेंद्रेचा सतीश भावबंदेने चक्क गळा दाबून, हातापायाच्या नसा कापून निघृण बळी घेतला. याचे कारण काय तर एकतर्फी प्रेम. केवळ भावनेच्या, क्रोधाच्या आहारी जाऊन त्याने हे कृत्य केले असेल की त्याच्या अंगी असणाऱ्या पुरुषी अहंकारामुळे? अशा या घटनांना जबाबदार कोण? ती व्यक्ती? कुटुंब? की समाज?

### प्रसार माध्यमांचा अनिष्ट परिणाम

लहान मुलांची मने संस्कारक्षम असतात. लहान वयातच त्यांच्यातला माणूस घडत असतो. पण ब्लॉक संस्कृतीमुळे माणसांची मने संकुचित झाली आहेत. आई-वडील दिवसभर नोकरीला बाहेर असल्यामुळे शाळेतून घरी आल्यावर मुले एकटीच घरी असतात. अशा लहान वयातच त्यांच्यावर अनिष्ट संस्कार झाल्यामुळे ती अशी अघोरी कृत्ये करायला धजावतात.

दूरचित्रवाणीवर ज्या मालिका, चित्रपट दाखविले जातात ते प्रेमप्रसंग आणि हिंसा यांनीच भरलेले असता. ते पाहिल्याने मुलांना लहान वयातच नको ती अक्कल येते. चित्रपटातील 'हिरो' आपल्याला हवे ते मिळविण्यासाठी वाटेल तशी हिंसा करतात. सर्व मुले हे चित्रपट अगदी टक लावून बघत असतात. 'हेच खरे जीवन' असे त्यांना वाटू लागते. त्यातूनच ते चित्रपटांचे अनुकरण करू लागतात. 'हिरो'चा आदर्श डोळ्यासमोर असतोच. त्यामुळे प्रेमभावना म्हणजे काय हे कळायच्या आधीच त्याच्या आहारी जाऊन मुले अविचार करू लागतात. नीता हेंद्रे, अमृता देशपांडे यासारख्या घटना सतत घडत असल्याने त्यात भरच पडत असते.

### पालक जागरूक हवे

जरी पालक जागरूक असले तरी मुले मोठी झाल्यावर सभोवतालच्या वातावरणाचा त्यांच्यावर गंभीर परिणाम होत असतो. मुलांना शाळा-महाविद्यालयात पाठविले म्हणजे आपली जबाबदारी संपली असे न समजता आई-वडिलांनी आपल्या मुलांवर बारीक लक्ष ठेवले पाहिजे. आपला मुलगा किंवा मुलगी कुठे जाते? काय करते? मुलांचे मित्र कसे आहेत? याच्यावर बारीक लक्ष ठेवणे आज अत्यंत गरजेचे आहे.

### न्यायव्यवस्था बदलायला हवी

आपल्याकडील न्यायव्यवस्था ही अत्यंत वेळाकाढू व विचित्र स्वरूपाची आहे. खटल्यांचे निकाल खूप उशीरा लागतात. तोपर्यंत अशा घटनांचे गांभीर्य निघून गेलेले असते. गुन्हेगारांना पळवाटा दाखविणारे कायदे आहेत. त्यामुळे सबळ पुराव्याअभावी गुन्हेगार सहीसलामत सुटतात. पोलीस देखील अशा गुन्हेगारांना संरक्षण देताना आढळतात. त्यामुळे लोक दहशतीमुळे अशा खटल्यांत साक्ष द्यायला पुढे येत नाहीत. अशा प्रकारच्या खटल्यांची सुनावणी शक्य तितक्या लवकर झाली पाहिजे. सूज्ञ वकिलांनीही गुन्हेगारांची केस लढविताना सामाजिक ऋणाचा विचार करावा.

हल्लीचा तरुणवर्गही आपल्या मनात जी गोष्ट येईल ती पूर्ण व्हायलाच पाहिजे असा हट्ट धरून बसतो. जर एखादी मुलगी आपणाला होकार देत नसेल तर तिचे आयुष्य संपविण्यातच पुरुषार्थ मानणाऱ्या तरुणांना जास्तीत जास्त शिक्षा झाली पाहिजे. तरच अशी समाजविघातक कृत्ये करू पाहणाऱ्या तरुणांवर त्याचा वचक बसेल. नाहीतर दुसरी नीता हेंद्रे निर्माण व्हायला फारसा वेळ लागणार नाही. ★★★

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळाच्या सभा

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायं. ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच चौथ्या शनिवारी सायं. ४ वाजता कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचेमधे परस्पर संपर्काचे सातत्य राहायला मदत होते. कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत सप्टेंबर २५, ऑक्टोबर ९ व नोव्हेंबर २७ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

## कार्यकारी मंडळात बदल

कार्यकारी मंडळाचे सदस्य **पद्माकर जगन्नाथ विद्वांस** (पृ. ६२९) हे कायम पुण्याला रहायला गेल्यामुळे त्यांना यापुढे कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून काय करणे शक्य होणार नसल्याने त्यांच्या कार्यकारी मंडळ सदस्यत्वाचा राजीनामा स्वीकारण्यात आला. तसेच यामुळे रिकाम्या झालेल्या जागी परळ येथील कुलबांधव **चिंतामण महादेव (पृ. २२२) यांना कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले.** त्यांच्या घरगुती अडचणी आता राहिल्या नसल्यामुळे त्यांनी प्रतिष्ठानचे कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

## वाढदिवस विशेषांकाबाबत

२६ जानेवारी हा प्रतिष्ठानचा वर्धापनदिन पुणे शाखेतर्फे दरसाल साजरा करण्यात येतो. त्याचा सचित्र वृत्तान्त देऊन हितगुज डिसेंबरचा अंक वर्धापनदिन विशेषांक म्हणून प्रसिद्ध करावा अशी पुणे शाखेकडून सूचना आली होती. तसे केल्यास डिसेंबर १५ रोजी प्रसिद्ध होणारा अंक फेब्रुवारी १५ रोजी प्रसिद्ध करावा लागेल. लगेच मार्च १५ रोजी मार्चचा अंक असतोच. त्यामुळे वर्धापनदिन समारंभाचा वृत्तान्त (सचित्र) १५ मार्चच्या अंकात देता येईल, असा कार्यकारी मंडळात चर्चेअंती निर्णय घेण्यात आला.

## देणग्या

मागील तिमाहीत खालील विशेष देणग्या प्राप्त झाल्या

१. **विनायक गोपाळ** (पृ. ६९) तथा भाऊसाहेब, अमेरिका यांचेकडून **उद्योग प्रवर्तन निधीसाठी रु. १०,०००**

२. परळ, मुंबई येथील सभासद **चिंतामण महादेव (पृ. २२२)** यांचेकडून त्यांची दिवंगत पत्नी कै. सुनिता हिच्या स्मरणार्थ **शिक्षण निधीसाठी रु. ५००० व वैद्यकीय निधीसाठी रु. ५०००.** या देणग्यांबाबतची भूमिका विशद करणारे चिंतामण महादेव यांचे पत्र याच अंकात छापले आहेत. ते सर्वांनाच विचारर्ह आहे.

३. डोंबिवली, जि. ठाणे येथील सदस्य **सुरेश गोविंद** (पृ. ८७) यांचेकडून त्यांची मुलगी कै. कु. श्वेता हिच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त, **शिक्षण निधीसाठी रु. १०००** (कु. श्वेताच्या अपघाती निधनाची वार्ता हितगुजच्या डिसेंबर १९९८ अंकात वाचल्याचे आपणास आठवत असेलच.)

४. प्रतिष्ठानचे सभासद **यशवंत लक्ष्मण** (पृ.१०१) विंग कमांडर, (निवृत्त), पुणे - **हितगुज निधीसाठी रु. २००**

५. **दत्तात्रय गणेश**, (पृ. ४३९) गोरेगांव (पू), मुंबई, **शिक्षण निधीसाठी रु. १०१**

६. **सदाशिव धुंडीराज** (पृ. ३७८), मुंबई सेंट्रल - **शिक्षण निधीसाठी रु. ५००**

## वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा २४.१०.१९९९ रोजी प्रतिष्ठानच्या कार्यालयांत घेण्यात आली. वार्षिक सभेनंतर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यांत आली. सभेला सुमारे ८० कुलबंधु-भगिनी उपस्थित होते. सभेचा वृत्तान्त स्वतंत्रपणे याच अंकात छापला आहे.

## उपसमित्यांचे कार्य

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेतील चर्चेनुसार निरनिराळ्या उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी उद्योग प्रेरणा समितीने भावी उद्योग-व्यावसायिकांकडून मागविलेल्या माहितीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. तसेच वैद्यकीय समितीने तज्ञांची व्याख्याने आयोजित केली. त्यांनाही उपस्थिती अल्पच होती. त्यामुळे याबाबतचा सभासदांचा प्रतिसाद कसा वाढवता येईल यासंबंधी नव्याने विचार करायला हवा असे वाटते.

**याबाबत कुलबांधवांनी आपले मौलिक विचार प्रसिद्धीसाठी पाठवावे.** हितगुजच्या माध्यमांतून यासंबंधी विचारांचे आदान प्रदान सुरू झाल्यास ते उपयुक्त ठरेल असे वाटते.

## वर्धापन दिन समारंभ - पुणे शाखा

मराठे प्रतिष्ठानचा २१ वा वर्धापन दिन बुधवार दिनांक **२६ जानेवारी २०००** रोजी साजरा होणार आहे.

या निमित्ताने 'आयकर एक समस्या व त्यावरील उपाय' या विषयावर **श्री. गजानन चिंतामण मराठे** यांचे व्याख्यान व मराठे प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक समितीचे प्रमुख **श्री. गणेश मोरेश्वर जाईल व त्यांच्या पत्नी सौ. विद्या जाईल** यांचे सुश्राव्य गायन होणार आहे.

तरी या कार्यक्रमास **कुलबांधवांनी** (पुण्याबाहेरीलहि) सहकुटुंब, सहपरिवार व मित्रमैत्रिणींसमवेत **उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.** कार्यक्रम विनामूल्य आहे.

**स्थळ-** वेदशास्त्रोत्तेजक सभेचे सभागृह,
पेशवे पार्क चौक, विश्व हॉटेल समोर,
पुणे - ४११०३०.

**वेळ-** सायंकाळी ४.३० ते ७.३०

## विवाह सहाय्य

'विवाह सहाय्य' या सदरात जून १९९९ अंकांत छापलेल्या माहितीच्या आधारे हितगुजकडे आलेली (सांकेतिक संपर्क साधणारी) पत्रे संबंधितांकडे पाठविण्यात आली. काहीजणांकडे थेट संपर्क साधणारी पत्रे आली असतील. संबंधितांनी याबाबत हितगुजला कळवल्यास या सदराच्या उपयुक्ततेबाबत खातरजमा करता येईल. या अंकांत आणखी काही स्थळांची माहिती देण्यात आली आहे.

कुलबांधवांनी आपल्या कुटुंबातल्या, नात्यांतल्या व परिचयातल्या मुलां-मुलींची माहिती हितगुजमधे प्रसिद्धीसाठी पाठवावी असे त्यांना पुन्हा



Marathe Pratishthan

एकदा आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः मराठ्यांच्या माहेरवाशिणी (आणि सासुरवाशिणीही) 'कपिगोत्री' नसणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांची माहिती पाठवून याबाबतीत मोलाचे सहकार्य करू शकतील.

## शिक्षण समिती

### 'कुतुहल'साठी मजकूर पाठवावा

आपल्या कुलबांधवामधे वेगवेगळ्या विषयातील तज्ञ आहेत तसेच चांगल्यापैकी सर्वसाधारण ज्ञान (General knowledge) असलेला अभ्यासू विद्यार्थीवर्गही आहे. बऱ्याच जणांना वाटत असेल की आपल्याकडे असणारी माहिती इतरांना सांगितल्यास त्यांना उपयुक्त वाटेल. ही माहिती विज्ञान कुतूहलाबाबत असेल किंवा खेळ/फिल्मी जगत किंवा इतर कोणत्याही विषयाबाबत असेल. अनेकांना ती माहीत नसेल, पण मिळाल्याचा आनंद देणारी असेल. उदा. 'अणुराखे' बद्दल जून १९९९ हितगुजमधे दिलेली माहिती.

'कुतूहल' हे सदर हितगुजमधे छापण्याचा विचार आहे यासाठी सुमारे १५०-२०० शब्दांचा मजकूर पाठवावा असे शिक्षण समितीतर्फे आग्रहाचे आवाहन करण्यात येत आहे. कार्यकारिणी किंवा तज्ञ व्यक्तीचा अभिप्राय घेऊन छापण्यासाठी मजकुराची निवड केली जाईल.

### गुणवत्ता पारितोषिके

प्रतिष्ठानच्या वार्षिक सभेनंतर गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे व बक्षिसे देण्याचा कार्यक्रम दरवर्षी होत असतो. यंदाही हा कार्यक्रम २४ ऑक्टोबर ९९ रोजी सकाळच्या सभेनंतर झाला.

यावर्षी एकूण ३५ अर्ज आले होते त्यापैकी २९ विद्यार्थी-विद्यार्थिनी बक्षिसपात्र ठरले. यापैकी ११ जण प्रत्यक्ष हजर होते. माननीय **श्री. विठ्ठल नारायण**, (पृ. २९१) यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व बक्षिसे देण्यात आली.

### Surprise Test

या कार्यक्रमाबरोबरच एका वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सुरवात केली. बक्षिस समारंभासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना Surprise Test दिली होती. अर्थात बक्षिसासाठी पात्रता व याचा काही संबंध नव्हता. दोन गटांसाठी दोन वेगळ्या टेस्ट होत्या. पहिला गटः ११वी/१२वी सायन्स व उच्च सायन्स शिक्षित; दुसरा गटः १०वी व नॉन सायन्स उच्च शिक्षित. दरवर्षी असा उपक्रम ठेवावा अशी कल्पना आहे. तसेच बक्षिसपात्र विद्यार्थ्यांनीच नव्हे तर इतरही विद्यार्थ्यांनी यात भाग घ्यावा व त्याबरोबरच त्या त्या वर्षीच्या बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक करावे अशी इच्छा आहे.

विद्यार्थी वर्गाने याबाबत काही सूचना, सुधारणा, मदत करण्याची इच्छा, भाग घेण्याची इच्छा याबाबत लिहावे ही अपेक्षा आहे. तसेच पुढील कार्यक्रमासाठी प्रश्नांची बँक तयार करण्यासाठी 'वैशिष्ट्यपूर्ण' प्रश्न उत्तरासहित पाठवावे ही विनंती आहे.

प्रश्नपत्रिका व उत्तरे तसेच प्रत्येक गटात १ला क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे सर्वांच्या माहितीसाठी छापली आहेत. प्रत्येक गटात १ला क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास पुढील वर्षीच्या कार्यक्रमात बक्षिस दिले जाईल. **वाचकापैकीच कोणीतरी ही बक्षिसे sponsor केली तर प्रतिष्ठानला जास्त आनंद होईल.**

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

- **डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ. २८४)
घाटकोपर, मुंबई, फोनः ५११३८५३
निमंत्रक, शिक्षण समिती.

### प्रश्न पत्रिका-१

**Surprise Test - Sci. 12th & Higher**
(Make a tick mark ( ✓ ) on the correct answer)

1) If diameter of a circle is doubled, the area of the circle will change
2 times / 4 times / 8 times / No change

2) In a clock during 12 hours, say from 6 am to 6 pm, how many times the hour and minute hands will make angle of 90°? 6 / 12 / 18 / 24

3) Four (4) cows give 4 cans of milk in 4 days, then Eight (8) cows will give 8 cans of milk in .... days
2 / 4 / 8 16

4) The tax rate has increased from 25% to 30%. Therefore effective rise is - 5% / 10% / 20% / 30%

---

**मराठे कुलबांधवांतला पहिला 'शेट्टी'**

एखाद्या 'शेट्टी'ला हॉटेल चालू करायचे असेल तर त्याचे व्यवसाय बंधू पैशासह सर्व मदत करुन ४-५ वर्षात त्याला व्यवसायांत प्रस्थापित करतात. मराठे प्रतिष्ठानने असा दृष्टिकोन स्वीकारून त्यासाठी 'उद्योग प्रवर्तन निधी' निर्माण करावा अशी सूचना काशिनाथ उर्फ प्रकाश श्रीधर (पृ. १९) यांनी केली होती (हित. सप्टें. ९८, पृ. ९). ऑक्टोबर १९९८ मधे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या कामासाठी उद्योग प्रेरणा समितीची स्थापना करण्यात आली. उद्योग प्रवर्तन निधीला सढळ हाताने मदत करण्याचे उद्योग प्रेरणा समितीचे निमंत्रक हेमंत महादेव यांचे आवाहन हितगुज जून १९९९ मधे वाचून **कुलवृत्तांताचे संपादक विनायक गोपाळ** (पृ. ६९) यांनी **रु. १० हजाराची 'छोटीशी देणगी'** या निधीसाठी देऊन 'मराठे कुळांतला पहिला शेट्टी' होण्याचा मान मिळविला आहे.

**असे आणखीही 'शेट्टी' लवकरच पुढे येतील अशी आशा आहे.** - संपादक

---

5) Sum of numbers from 11 to 100 (both inclusive) will be
111 / 1100 / 4995 / 5050

6) If number of neutrons in the atom of U-238 are 146, then the number of neutrons in U-235 will be
same (146) / 92 / 143 / 235

7) The valency of iron in $Fe_2O_3$ is
2+ / 3+ / 6+ / 3-

8) The percentage of hydrogen in water is approximately
2 / 9 / 11 / 18

9) The speed of light is (approx) (m=metre)
$3x10^8$cm/s / $3x10^8$ m/s / $3x10^8$ km/s / $3x10^{10}$ m/s

10) When heat is felt from sun or fire, the type of heat transfer is
conduction / convection / radiation / No particular type



Marathe Pratishthan

**Answers :** (1) 4 times, (2) 24, (3) 4, (4) 20%, (5) 4995, (6) 143, (7) 3+, (8) 11, (9) $3x10^8$ m/s, (10) radiation.

**प्रथम क्रमांक** -

अनघा नंदकुमार, ठाणे } विभागून
नंदन राजेंद्र, ठाणे } गुण ७/१०

## अनुकरणीय

माझी पत्नी सौ. सुनिता हिचे प्रदीर्घ आजाराने ९ ऑगस्ट १९९९ रोजी निधन झाले. तिच्या मरणानंतर मी माझ्या मतानुसार कोणतेही धार्मिक (प्रचलित) संस्कार केले नाहीत. पण सामाजिक बांधिलकी, आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे आपण काही देणे आहोत ह्या दृष्टीने मी पाच सेवाभावी संस्थांना देणगी रूपाने मदत करण्याचे ठरविले आहे. माझ्या आईच्या निधनानंतरही मी ५ संस्थांना देणगी रूपाने मदत केली होती. त्यामधे आपले मराठे प्रतिष्ठान ही संस्था होती.

हल्ली पितृपंधरवडा आहे. म्हणजे पितरांच्या नावे श्राद्ध करावयाचे. पितर म्हणजेच आपल्या कुलाची आठवण करावयाची. एरवी शुभकार्य प्रसंगीही आपण आपल्या कुलदेव, कुलदेवतेचे स्मरण करतो. **ह्याच रूढीला आधुनिकतेची जोड द्यावी, रूढीचा वैज्ञानिक अर्थ जाणून घेऊन तसे आचरण करावे. आपल्या कुलाच्या भल्यासाठी झटणाऱ्या मराठे प्रतिष्ठानला सर्वांनी आपल्या घरातील कोणत्याही प्रसंगी यथायोग्य देणगी द्यावी असे वाटते.**

मी माझ्या पत्नीच्या स्मरणार्थ मराठे प्रतिष्ठान ह्या संस्थेच्या शैक्षणिक निधी व वैद्यकीय निधीस प्रत्येक रु. ५००/- ची देणगी देत आहे. स्वीकार व्हावा.

पत्नीच्या आजारपणामुळे मी संस्थेचे सक्रिय कार्य करू शकत नव्हतो. आता यथाशक्ति करण्यास मला जमेल असे वाटते.

- **चिंतामण महादेव** (पृ. २२२),
लालबाग, मुंबई.

## प्रश्न पत्रिका-२

**Surprise Test - 10th Sci. & Non-Science Higher**

(Make a tick mark ( ✓ ) on the correct answer)

1) Which of the following two numbers is greater?

$\sqrt{0.49}$ , 0.60

2) 1 tailor makes 1 suit in 1 day, then 5 tailors will make 5 suits in how many days?

3) Which of the following fractions is smallest?

$\frac{2}{3}$, $\frac{3}{4}$, $\frac{4}{5}$, $\frac{5}{6}$

4) Kumble's run average is 12.3. In the next match he had zero runs but avarage was same. What do you infer?

5) The ratio of boys to girls in class is 3:2. If 10 boys failed in exam, what is the ratio in new class?

6) Which is the most abundant gas in air?

7) What is the minium distance required for reflection of sound from object to hear the echo?

8) Hard water contains mainly salts of — and —

9) How you will know whether a solution is acidic or alkaline without touching by hand or tongue?

10) When is the moon rise (approximately) on 'Amavasya' day?

**Answers :**

(1) $\sqrt{0.49}$ (2) One Day
(3) 2/3 (4) Not out
(5) प्रश्न बरोबर नाही.(6) Nitrogen
(7) 17 Metres/55 ft
(8) Ca - Calcium and Mg - Magnesium
(9) Litmus test - red if acidic blue if alkaline
(10) Morning - along with sunrise (around)

**प्रथम क्रमांक** -

मेघना सदाशिव, मुंबई सेंट्रल गुण ७.५/१०

## खुषीपत्रे

१. तुमचे पुष्कळ 'उद्योग' आहेत, पण आता आमच्या दृष्टीने **लक्ष्मणराव म्हणजे 'हितगुज' असे समीकरण होऊ लागले आहे.** (मीहि अलिकडे फोनवर 'हितगुज मराठे' असाच प्रतिसाद देतो आहे. - संपादक) जून आणि सप्टेंबर दोन्ही अंक दर्जेदार निघाले आहेत. डॉ. राम बिवलकर यांना विचारा.

मला वाटते आता संपादकांना 'चांगले ठेवा, भिकार टाकून द्या' असे म्हणण्याएवढे साहित्य मिळू लागले असावे. (अजून अशी वेळ नाही हो आली! तुमच्या तोंडात साखर पडो आणि ती वेळ लवकर येवो!! - संपादक) एक काळ असा होता की 'हितगुज' केवळ एकमार्गी माहितीपत्रक होते. त्याला वाचकांचा प्रतिसाद जेमतेमच असायचा. कल्पकता आणि परिश्रम कौतुकास्पद आहेत.

व्हीके जर असे इतिवृत्त देणार असतील तर या पुढच्या 'गौरव' ला स्वतः उठून जा कशाला! वानखेडेवरच्या उन्हात करपण्याऐवजी टीव्हीच बरा. व्हीकेंची सुप्त कर्तबगारी 'हितगुज'मुळे प्रत्ययाला आली म्हणजे श्रेय पुन्हा तुम्हालाच.

सप्टेंबर अंक ४ दिवसांपूर्वी मिळाला. यात देखील व्हीकेंनी रिपोर्टिंग चांगले केले आहे. वा. ग. यांना हॅलो करायचा विचार आहे. पाहूया. पुण्याच्या अण्णांना पत्र लिहायचे आहे. त्यांनी संकलित केलेली आचारसंहिता उपयुक्त वाटते. सर्व गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या.

- **विनायक गोपाळ** (पृ. ६९)
सॅन होजे, अमेरिका.

२. वाट पहातच होतो आपल्या अंकाची मोठ्या आतुरतेने. अंक मिळाला सप्टेंबर १९ ला. आनंद वाटला. अंकातील विशेष व उल्लेखनीय लेख म्हणजे (१) आपले आरोग्य, (२) अनोखी आचारसंहिता, (३) मधुमेह व (४) हजरजबाबीपणा.

अंक दर्जेदार तर आहेच पण वाचावासा वाटणारा व संग्रह योग्य असा आहे. आम्ही मराठे परिवारातील मंडळी अंक वाचून खूष होतो. चर्चा होते. वधू-वर माहितीचा उपयोग करून घेऊच.

**भास्कर दत्तात्रय**, वाडा
(पृ. २१-दत्तात्रय विष्णू यांचा मुलगा)



Marathe Pratishthan

## सभासद वृत्त

**साहित्यभूषण गायत्री गणेश**

प्रतिष्ठानच्या सदस्या **सौ. गायत्री गणेश जोशी** (पृ. ६७६) या कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक आयोजित साहित्यभूषण पदवी परीक्षेत (मे १९९९) ६३.६ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

**सुबोध विद्वांस - ICWA**

प्रतिष्ठानचे सदस्य **सुरेश श्रीधर** (पृ. ६४८) **यांचा मुलगा सुबोध विद्वांस** जून १९९९ मधे झालेल्या ICWA च्या फायनल परीक्षेत उत्तीर्ण झाला. सुबोधचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

**विद्यार्थी परिषद अध्यक्ष - मीनल मराठे**

पदव्युत्तर राज्यशासन विभागाची विद्यार्थिनी **मीनल श्रीराम** (पृ. ४२८) हिची मुंबई विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. या यशाबद्दल मीनलचे अभिनंदन.

**गणेश विनायक अमेरिकेत**

प्रतिष्ठानचे **कार्योपाध्यक्ष गणेश विनायक** (पृ.११५) ११.१०.१९९९ रोजी खाजगी दौऱ्यावर अमेरिकेस रवाना झाले. परिवार व मित्रमंडळींना भेटून ते जानेवारी २००० मधे परत येतील.

**सहवेदना**

१. भोर येथील **प्रतिष्ठानचे आजीव सदस्य श्रीपाद शंकर** (पृ. २५१) यांचे वयाच्या ६७व्या वर्षी २८.७.१९९९ रोजी कॅन्सरने निधन झाले.

२. मुंबईतील सभासद **विष्णु मारुती रटाटे यांची सून मंदीकिनी उल्हास** (पृ. ७५९) हिचे वयाच्या ४७व्या वर्षी ४.८.१९९९ रोजी कॅन्सरने निधन झाले.

३. मराठे प्रतिष्ठानचे **लालबाग, मुंबई येथील सभासद चिंतामण महादेव (पृ. २२२) यांची पत्नी सुनिता** हिचे वयाच्या ५५व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने ९.८.१९९९ रोजी निधन झाले.

४. दहिसर, मुंबई येथील कुलबांधव शैलेंद्र यांचे वडील **भास्कर कृष्ण** (पृ. १७) यांचे २४.८.१९९९ रोजी निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते.

५. पुणे येथील प्रतिष्ठानचे सभासद विनायक शंकर खांबेटे याचें बंधु **प्रमोद शंकर** (पृ. ६७६) यांचे अल्पशा आजाराने ५.९.१९९९ रोजी निधन झाले.

६. प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष **सीताराम गोपाळ खांबेटे याचे बंधु अशोक** (पृ. ६७७) यांचे अल्पशा आजाराने १५.९.९९ रोजी वयाच्या ४७व्या वर्षी निधन झाले. ते सेंट्रल एक्साईजमधे इन्स्पेक्टर म्हणून नोकरी करत होते.

७. खुडीपाट, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **परशुराम विष्णु** (पृ. ११६) यांचे २७.९.९९ रोजी अल्पशा आजाराने ६३व्या वर्षी निधन झाले. ते खुडी ग्रामपंचायतीचे सरपंच होते.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

**टीकेविना**

आपणास मागे कळविल्याप्रमाणे इयत्ता १०वी शालान्त परीक्षेच्या फेरतपासणीमध्ये माझे ११ गुण वाढले असून (टक्केवारी ८९.४६ वरून ९०.९३ झाल्याने) माझा **बोर्डाच्या गुणवत्ता यादीत २१वा नंबर** आला आहे.

**अनघा नंदकुमार** (पृ. ३२३), ठाणे

# १७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त

- **विनायक केशव** (पृ. २०), वरळी, मुंबई, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान.



श्री. पंत मराठे भाषण करीत असून बसलेले (डावीकडून उजवीकडे) कार्यवाह विनायक केशव, सभाध्यक्ष लक्ष्मण शंकर आणि कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे.

मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांच्या गैरहजेरीत प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व हितगुजचे संपादक **श्री. ल. शं. मराठे** यांची सर्वानुमते १७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे **सभाध्यक्ष म्हणून निवड** झाली.

प्रतिष्ठानचे कार्यवाह विनायक केशव यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

वृत्तान्त साली निधन पावलेल्या सर्व ज्ञात अज्ञात कुलबांधवांना तसेच कारगिल युद्धात मातृभूमीसाठी वीरगती प्राप्त झालेल्या शूर भारतीय सैनिकांना दोन मिनिटे शांतता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभेच्या रीतसर कामाला सुरवात झाली.

१६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

त्यानंतर १९९८-९९ या वर्षाचा कार्यकारी मंडळाचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च मंजूर करण्यात आला.

हिशेब तपासनीसांच्या नेमणुकीबाबत विचार करताना काही कुलबांधवानी असा विचार मांडला

Marathe Pratishthan

की आपल्यापैकी अनेकजण चार्टर्ड अकौटंट आहेत. त्यापैकीच कोणीतरी हे काम करावे. यावर आपले विश्वस्त अरविंद दामोदर यांनी सांगितले की त्यांचे चिरंजीव हे काम करतील. सबब प्रचलित हिशेब तपासनीस गद्रे व बाळ यांची पूर्व संमती घेऊन १९९९-२००० या सालासाठी मे. मराठे आणि गोडसे चार्टर्ड अकाऊंटंट यांची हिशेब तपासनीस म्हणून नेमणूक करण्यात यावी व त्यांना रु. ७५० एवढे मानधन देण्यात यावे असे ठरविण्यात आले.

प्रतिष्ठानचे विश्वस्त **अरविंद दामोदर** स्वतःच्या चार बहिणींना हितगुजची भाऊबीज घालणार आहेत असे त्यांनी सांगितले.

**पंत मराठे** यांनी हितगुजच्या मागील अंकात छापलेली वर्षातून ६ अंक काढावे ही सूचना उचलून धरली. तसेच सभासदांचे पत्ते मराठीमध्ये असावे अशी सूचना केली.

प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक कार्यक्रमाबद्दल **सौ. विद्या जाईल** यांनी कलाकारांना त्यांचेकडे आपली नावे द्यावी अशी सूचना करताना पुढील संगीत मैफल डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान ठरवण्यात यावी असा आग्रह केला.

वैद्यकीय समितीच्या **डॉ. शरद मराठे** यांनी स्वास्थ्य विषयक व्याख्यानांना फारच थोडे सभासद उपस्थित असतात अशी व्यथा व्यक्त केली.

कुलवृत्तांत समितीच्या **श्री. सी. गो. खांबेटे** यांनी प्रतिष्ठानला कार्यकर्त्यांची मदत आवश्यक असल्याचे सांगून बऱ्याच ठिकाणी आपले कार्यकर्ते पोचले नसल्याचे सांगितले. कर्नाटकामध्ये मराठे कुलबांधव मोठ्या संख्येने आहेत. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी कर्नाटक मोहीम काढल्यास खूपच चांगला प्रतिसाद मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्योग प्रेरणा समितीचे **श्री. अशोक मराठे** यांनी आपला अनुभव सांगताना ठाणे-डोंबिवली-कर्जत परिसरात मराठे कुळातील ३०० ते ३५० कुटुंब आहेत, पण प्रयत्न करूनसुध्दा त्यातील तरुणमंडळी उद्योग व्यवसायाकडे वळत नाहीत अशी खंत व्यक्त केली. कोणत्याही व्यवसायात किमान ५ वर्षे श्रम करण्याची तयारी हवी. कितीही संख्येने तरुण पुढे आल्यास मी त्यांना सर्वतोपरी मदत करीन असे त्यांनी आश्वासन दिले.

शिक्षण समितीचे **डॉ. सुरेंद्रनाथ मराठे** यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात अर्ज करावे व त्यामध्ये शैक्षणिक माहितीबरोबर त्यांच्या आवडीचे क्षेत्र व त्यांच्या भावी योजना यांचा आवर्जून उल्लेख करावा अशी सूचना केली. याच संदर्भात **सौ. विद्या जाईल** यांनी कोणत्याही क्लासचा आधार न घेता यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे खास कौतुक करावे अशी सूचना केली.

**पंत मराठे** यांनी जनकल्याण बँक व सिध्दिविनायक निधी या संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध असल्याचे सांगून सभासदाना अडचणीच्या प्रसंगी या संस्थांकडून मदत वा कर्ज मिळू शकेल व त्या संदर्भात ते स्वतः मदत करतील असे आश्वासन दिले.

**सौ. अर्चना साठे** यांनी प्रतिष्ठानचे कार्य करण्याचे व किमान ६० सभासद करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षपदावरून समारोपाचे भाषण करताना **सभेचे अध्यक्ष श्री. ल. शं. मराठे** (हितगुज) यांनी पुढील विचार व्यक्त केले.

पंतांची हितगुजचे वर्षाला सहा अंक काढावे ही सूचना स्वागतार्ह आहे पण मनुष्यबळ पाहिजे. सध्या हितगुज हा एक खांबी तंबू आहे. या कामासाठी तरुणांनी आपला सहभाग द्यावा अशी आमची अपेक्षा आहे. पंतानी सुचविलेल्या संस्थांकडून गरजू तरुणांनी जरूर मदत घ्यावी. अशोकरावांची तरुणांना उद्योग धंद्यात मदत करण्याची इच्छा आहे. पण आपलं भलं करून घ्यायला तरुणच तयार नाहीत ही खरोखरच चिंतेची बाब आहे. 'गर्भा'च्या 'बेस्टायन' चा १०० वा कार्यक्रम आपण प्रतिष्ठानतर्फे साजरा करूया. हितगुजला निरनिराळे प्रायोजक मिळावे अशी आमची अपेक्षा आहे.

सभेनंतर निवृत्त केंद्र सरकारी अधिकारी व आज वयाच्या ७८ व्या वर्षीहि १२वी पासून I.I.T. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे **ज्येष्ठ व श्रेष्ठ कुलबांधव विठ्ठल नारायण** (पृ. २९१) यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. या पारितोषिक वितरण समारंभाला यशस्वी विद्यार्थी पालकांसह उपस्थित होते.

(सर्व बक्षिस पात्र विद्यार्थ्यांची नांवे व त्यांनी निरनिराळ्या परीक्षांत मिळवलेले गुण यांची माहिती याच अंकात स्वतंत्रपणे छापली असून समक्ष उपस्थित राहून पारितोषिके घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित छायाचित्रहि छापले आहे. - संपादक)

★★★

मला आवडलेली कविता

**बुद्ध, सुबुद्ध, वृद्ध!**

प्रेषक : **वामन आत्माराम**, (पृ. ३६६), पुणे


मी, एक सुबुद्ध, सात्विक आणि शुद्ध,
चुकून डोकावतो स्वतःच्या अंतर्यामी मर्जीविरुद्ध,
अन् हे काय? माझ्याच अंतर्यामी
एवढे प्रलयंकारी युद्ध,
सुखदुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, बुद्धि,
सारेच भांडताहेत एकमेकांविरुद्ध,
कुणास ठाऊक त्यांना काय करायचयं सिद्ध,
असा विचार येईतो खांद्यावर हात पडतो,
आत्मा हसून म्हणतो, अरे,
सिद्ध-प्रसिद्ध, जीत-हार, हा तर झाला व्यवहार
तू त्याचा विचार करू नकोस फार.
प्रत्येकाच्या अंतर्यामी असतंच एक कुरुक्षेत्र
इथं ना कुणी शत्रू, ना कुणी मित्र
ना पापी ना पवित्र, ना सख्खे ना सावत्र
तरी सुद्धा युद्ध सुरूच अहोरात्र
यांना जो जिंकतो तो होतो बुद्ध
नाहीतर केवळ वृद्ध!

कवी: डॉ. विनय हुईलगोळकर



Marathe Pratishthan

# १९९८-९९मधील विविध परीक्षांतले बक्षीसपात्र विद्यार्थी



विठ्ठल नारायण बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असून शेजारी बसलेले प्रतिष्ठानच्या शिक्षण समितीचे निमंत्रक डॉ. सुरेंद्रनाथ



**मागील रांग (उभे)** - नंदन राजेंद्र, निशाद गणेश जाईल, सौरभ सुरेश, राधिका वसंत, समीर दत्तात्रय, अतुल अशोक साठे, अभिजीत अशोक. **पुढील रांग (बसलेले)** - वेदश्री माधव खांबेटे, अनुजा दिलीप, डॉ. सुरेंद्रनाथ, विठ्ठल नारायण, मेघना सदाशिव, अनघा वसंत

## अ) माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

१) **अनघा नंदकुमार** ★ (पृ.३२२), ठाणे **बोर्डात २१वी,** ९०.९३%
२) **सुव्रत प्रफुल्ल चक्रदेव** (पृ.७३७), पुणे ९०.२६%
३) **अतुल अशोक साठे** (पृ.६७०),८९.२०%८)
४) **मेघना सदाशिव** (पृ.३७८), मुंबई ८९.०६%
५) **सायली सतीश** (पृ.५५३), पुणे ८८.९३%
६) **नंदन राजेंद्र** (पृ.२९१), ठाणे ८८.८०%
७) **निशाद गणेश जाईल** (पृ.७५८), कुर्ला (प.), मुंबई ८५.४६%
८) **रश्मी मुकुंद बापट** (पृ.७३७), पुणे ८५.३३%
९) **अभिजित अशोक** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई ८४.२६%
१०) **स्वप्ना बाळकृष्ण** ■ (पृ.५०५) मु. पो. तुळस, जि. सिंधुदुर्ग. ८२%
११) **अर्चिस रविंद्र** (पृ.३६६), घाटकोपर, ७९.६०%

## ब) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)

१) **स्नेहल सुहास** ★ (पृ.४१९), किर्लोस्करवाडी, जि. सांगली ९०.३३% (सायन्स)
२) **गणेश प्रसाद रामकृष्ण** (पृ.२९०), बोरिवली, मुंबई ८३% (सायन्स)
३) **अमेय अनंत** (पृ.३५९), ८२.६७% (सायन्स)
४) **राधिका वसंत** (पृ.९०), विलेपार्ले ७९.१५% (सायन्स)
५) **सौरभ सुरेश** (पृ.८७) डोंबिवली (प) ७७.५०% (सायन्स)
६) **अभिजीत श्रीकांत नाईक** (पृ.६९५), ७६% (सायन्स)
७) **शीतल गजानन** (पृ.१२९), पुणे ७५.५०% (सायन्स)
८) **वेदश्री माधव खांबेटे** (पृ.७०५), मुंबई सेंट्रल, ७२.५०% (आर्टस्)
९) **अनुजा दिलीप** (पृ.३१४), दादर, मुंबई ६८.१७% (आर्टस्)

## क) पदविका/पदवी/उच्च पदवी


१) **सीमा सुधाकर** (पृ.३६६), वाडिया इन्स्टिट्यूट, पुणे मधून डिप्लोमा, डी.इ.आर.इ. ६६.९%
२) **पद्मालया गजानन** (पृ.२७०), तळेगाव ८२%, बाथिया इन्स्टिट्यूट, पुणे मधून कॉम्प्युटर इंजिनियरिंग डिप्लोमा
३) **आशिश मोरेश्वर** (पृ.५४२), गोवा विद्यापीठ, बी.कॉम. डिस्टिन्क्शन
४) **समीर दत्तात्रय** (पृ.४३९), गोरेगावं (पू), ६०% मुंबई विद्यापीठ, बी.कॉम.
५) **अमित अशोक** (पृ.१८८), गोवा, बी.ई.(कॉम्प्यु.), बी.आय.आय.एस., पिलानी
६) **गिरिजा रघुवीर** (पृ.४२२), बडोदा, ६८.४१%, महाराजा सयाजीराव विद्यापीठ मधून बी.ई. (मेटॅ.)
७) **अश्विनी प्रकाश विद्वांस** (पृ.६४५), ३.३७% एम.बी.ए. (गुजरात विद्यापीठ)
८) **दीपाली वसंत** (पृ.१६३), पनवेल ६३%, एम.एस.डब्ल्यु. पुणे विद्यापीठ
९) **सौ. प्रज्ञा आशिश गोखले** (पृ.२९०), बोरीवली (प), मुंबई, ५९%, सौराष्ट्र विद्यापीठातून एम.डी. सायकॉलॉजी

★ म. प्र. गुणवत्ता पारितोषिकांशिवाय अनघा नंदकुमार आणि स्नेहल सुहास यांना अनुक्रमे १०वीत व १२वीत मराठे कुलबांधवांमधे सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल प्रत्येकी रु. २५१ चे कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिक

■ म. प्र. गुणवत्ता पारितोषिकांशिवाय संपूर्ण हिंदी विषयात मराठे कुलबांधवांमधे सर्वाधिक गुण (८७/१००) मिळविल्याबद्दल सौ. सुलभा अनंत यांनी प्रायोजित केलेले पारितोषिक रु. १०१

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिक (प्रत्येकी रु. २५०/-) आणि १०वीत व्होकेशनल विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास प्रभाकर गणेश प्रायोजित रु. ५०१ चे पारितोषिक यांना कोणीही विद्यार्थी पात्र ठरले नाहीत.

Marathe Pratishthan



# संगणकाची समस्या - Y2K

***कॉम्प्युटरच्या वापरातली Y2K ची समस्या ही काहीतरी भीषण आपत्ती आहे अशी अनेक सर्वसाधारण माणसांची कल्पना झाली आहे. याबाबत हितगुजमध्ये लेख द्यावा अशी विनंती आमचे एक साक्षेपी वाचक खुडीपाटचे वसंत रावजी (पृ.११७) यांनी केली. त्यानुसार हा लेख.***

***गेली अनेक वर्षे निरनिराळया संस्थांना मार्गदर्शन करणारे कॉम्प्युटर तज्ञ व कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्याचा दिर्घानुभव असणारे कुलबांधव सुधीर कृष्णाजी चक्रदेव (पृ. ७३१) यांच्या या लेखामुळे अनेकांच्या मनातील Y2K चा बागुलबुवा नाहीसा होण्यास नक्कीच मदत होईल. - संपादक***

Y2K म्हणजेच इ. सन २००० सालची समस्या. ही समस्या या शतकाच्या अंताला उद्‌भवली आहे. आपण बोलतांना असे म्हणतो की, ४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळाले किंवा ५७ साली 'फ्लू' ची साथ आली, तेव्हा आपण १९०० गृहीत धरतो. हीच पद्धत संगणकावर काम करतांना वापरली गेली.

संगणकाचा शोध चालू शतकाच्या मध्याच्या आसपास लागला व त्याचा वापर शस्त्रीय व लष्करी उपयोगासाठी केला गेला. व्यापारी व्यवहारात उपयोगाचे संगणक १९६० पासून आले. सुरवातीच्या काळातील संगणक आताच्या संगणकापेक्षा ५०० ते १००० पट महाग, आकाराने प्रचंड व कमी क्षमतेचे होते. व्यावहारिक कामासाठी तारखेचे वर्ष दोन अंकात नोंदल्यामुळे, शतक दर्शवणारी संख्या म्हणजे १९ ही वरीलप्रमाणेच गृहीत धरण्यात आली. असे करण्यामुळे श्रमांची व संगणक सामुग्रीची बचत झाली. आता मात्र ही पद्धत तातडीने म्हणजेच १-१-२००० पूर्वी बदलणे आवश्यक आहे.

या समस्येवर उपाय म्हणजे (१) संगणकातील सर्व नोंदींचे (Records) तारखांमधील वर्षासाठी चार अंक वापरून पुनर्लेखन करणे आणि (२) संबंधित कार्यपद्धतीमधे (Software) योग्य तो बदल करणे. यातही पहा, आपण वर्षासाठी चारच अंकांची योजना करीत आहोत. पाच किंवा अधिक नव्हे.

यात काही चूक किंवा अ-दूरदर्शीपणा नाही. संगणकावरील नोंदींचे अशा तऱ्हेने पुनर्लेखन करताना मुख्य गरज संगणक सामुग्रीची आहे. याउलट कार्यपद्धतीत बदल करणे हे काम कठीण असून त्याला कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. शिवाय त्यात चुका राहून जाण्याची शक्यता आहे. गेल्या दोन अडीच वर्षात हे काम भारतातील कंपन्यांनी, विशेष करून अमेरिकेतील ग्राहकांसाठी करून देऊन परकीय चलनात भरघोस कमाई केली आहे.

१९८२ पासून वापरात आलेल्या IBM PC आणि तत्सम संगणकांमधे घड्याळ/दिनदर्शिका (RTC) अंतर्भूत असते. त्यातील साधारण १९९५ व त्यापूर्वीच्या संगणकांमधे ३१ डिसेंबर १९९९ नंतर वर्ष २००० होण्याऐवजी १९०० किंवा १९८० होईल व त्यावर आधारित असलेल्या कार्यपद्धतीत गमतीदार, चुकीचे निष्कर्ष दिसतील. गेल्या तीन चार वर्षात बनलेल्या IBM PC व तत्सम संगणकांमधे हा दोष नाही. सदोष संगणकांमधील दोष दूर करण्यासाठी त्यात आणखी उपकरण (Ad - On - Card) बसवता येते.

शिवाय काही संगणकांमधे हा दोष कोणत्याही नव्या उपकरणाशिवाय (device) केवळ कार्यपद्धतीतील भरीने (TSR) दूर करणे शक्य आहे. इतकेच काय, जिथे स्वतःची तबकडी (Disk) नसलेले संगणक एकाच मोठ्या तबकडीत असलेल्या संगणकाला (Server) जोडून वापरले जातात तिथे वेळ व तारीख ही मोठ्या संगणकातून घेतली जाते. त्यामुळे त्यांच्यात वरील दोष असला तरी ते संगणक बदलण्याची आवश्यकता नाही. प्रत्यक्षात मात्र स्वतःचे खिसे भरण्यासाठी अनेक संस्थांतील पदाधिकाऱ्यांनी संगणक बदलण्याचा सपाटा लावला आहे. आपल्या देशात यापेक्षा काय वेगळी अपेक्षा करावी?

आपल्या देशात संगणकाच्या वापराचे व त्यावर संपूर्ण भरवसा ठेवण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणून १ जानेवारी २००० ला फार मोठे घोटाळे होण्याची शक्यता नाही. एखाद्या संस्थेत कर्मचाऱ्यांच्या नोंदी संगणकावर असतील आणि आपण त्यातून २००० जानेवारी मधे ३० वर्षे सेवा किंवा वयाची ५८ वर्षे पूर्ण करणाऱ्यांची जंत्री काढली तर २००० च्या जागी ० (शून्य) घेऊन त्यातून ३० अथवा ५८ वजा करून व वजा चिन्ह सोडून देऊन संगणक १९३० मधे रुजू झालेल्या किंवा १९५८ मधे जन्मलेल्यांची जंत्री देईल. नव्या वर्षात संगणकाकडून निघणाऱ्या निष्कर्षाचे नीट परीक्षण करावेच लागेल.

देशात बँकांच्या साधारण ६५००० शाखा आहेत. त्यातील सुमारे ५००० संगणक वापरतात. हे संगणकीकरण गेल्या ७-८ वर्षात झाले आहे. सुरवातीच्या १-२ वर्षात इ. सन २००० ची समस्या लक्षात न घेता काहींनी २ अंकी वर्ष वापरूनच आपली कार्यपद्धती बनवली. परंतु ठेवींच्या व कर्जाच्या मुदतपूर्तीच्या तारखा २००० व त्यापलिकडे पडू लागल्या तेव्हाच कार्यपद्धतीत बदल करायला सुरवात झाली. खेरीज, रिझर्व बँकेने संगणकीकृत शाखांना योग्य ती खबरदारी घेण्याचे आदेश दिलेले आहेत, आणि त्याचे परीक्षणही केले गेले आहे. तरी १ जानेवारी २००० ला बँका बंद पडतील असे म्हणण्यात काही तथ्य नाही. बाकी काय गमती जमती होतील ते १ जानेवारी २००० ला पाहूच! ★★★

## खुषीपत्र

सप्टेंबर ९९चे 'हितगुज' मिळाले. माझे पती रा. चिं. मराठे नेहमी वाचतात. यावेळी मी वाचायला घेतले. सर्व मजकूर मला आवडला. मराठे कुळासाठी आपण खूप चांगले काम करीत आहात. अभिनंदन!

- **संजीवनी मराठे** (पृ. २४६), पुणे



Marathe Pratishthan

# मराठे परिवार व्यक्ति-सूची - २०००

**मराठे प्रतिष्ठानच्या** गतसालच्या वार्षिक अहवालात **'मराठे डिरेक्टरी-२०००'** या उपक्रमाचे सूतोवाच केलेले आपण वाचले असेलच. तदनुसार आज जिवंत असलेल्या आबाल वृद्ध मराठे परिवारीय व्यक्तींची सूची या अंकापासून देत आहोत.

त्याकरिता सर्वप्रथम 'मध्यप्रदेश राज्याने' सुरूवात करू. **''मराठे तितुके मेळवावे''** या ब्रीदाने वाटचाल करते वेळी आसामपासून केरळपर्यंत व परदेशांतही पोचलेल्या मराठ्यांची वस्ती प्रामुख्याने पुणे, मुंबई, ठाणे, गोवा व कोकण येथेच केंद्रित झाल्याचे दिसून येते. तथापि इतर प्रांतांपैकी मध्यप्रदेश, गुजरात व कर्नाटक या विभागांत मोठ्या संख्येने 'मराठे' राहत असूनहि त्यांना 'मराठे प्रतिष्ठान' या सर्व मराठे मंडळींना एका सूत्राने जोडणाऱ्या संस्थेच्या कार्याची पुरेशी ओळख नसावी असे दिसते.

सोबतच्या सूचीवरून मध्यप्रदेशांत एकूण २२२ मराठे व्यक्ती आहेत त्यापैकी हितगुजचे सदस्य फक्त ६ इतकेच आहेत. अशीच परिस्थिती अन्य विभागांची (मुंबई-पुणे वगैरे वगळता) आहे.

म्हणूनच **'मराठे डिरेक्टरी-२०००'** यथावकाश प्रसिद्ध करण्याचे अगोदर, ही विभागनिहाय सूची परस्पर संपर्काचे माध्यमातून माहिती मिळविणे व प्रतिष्ठानचे आजीव सदस्य व हितगुजचे तहहयात वर्गणीदार बनविणे या कामी मार्गदर्शक व्हावी. तसेच अशा सूचीत आलेल्या उल्लेखात सुधारणा व अनुल्लेख असल्यास, त्याबद्दल सूचना कोणीही कुलबांधवानी त्वरित संपर्क साधून कराव्यात अशी अपेक्षा आहे.

या बाबतीत खालील गोष्टी विशेष लक्षात घ्याव्यात.

१) या सूचीतील उल्लेखित व्यक्तींचा पत्ता बदलला असल्यास किंवा अपूर्ण असल्यास पूर्ण करून प्रतिष्ठानच्या प्रभादेवी कार्यालयास कळविणे.

२) मृत व्यक्तींची माहिती कळविणे.

३) या सूचीत आ. स. क्र. (आजीव सदस्य क्रमांक) व हि. व. क्र. (हितगुज वर्गणीदार क्रमांक) फार थोड्या व्यक्तींच्या नावामागे आहे. पण ही संख्या वाढविणे अगत्याचे आहे व त्याकरिता सध्याच्या सभासदांनी आपापल्या शहरातील/विभागातील सदस्य नसलेल्या व्यक्तींशी वैयक्तिक संपर्क साधून स्थानिक पातळीवर प्रयत्न करावा.

४) हितगुज वर्गणीदार संख्या ८०० वरून १००० वर नेणे हे सन २००० चे लक्ष्य असेल. त्या दृष्टीने, या वर्षी मध्यप्रदेश, गुजरात व कर्नाटक या प्रदेशात राहणाऱ्या कुलबांधवांचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच अन्य ठिकाणच्या कुलबांधवांनी सुद्धा या कामी विशेष प्रयत्न करावेत.

५) ही सूची आठ पृष्ठांची हितगुजमधे पुरवणी म्हणून वेगळे पृष्ठक्रमांक देऊन प्रसिद्ध करीत आहोत. त्याकरिता जाहिरातीची अपेक्षा आहे. आपापल्या विभागाची स्वतंत्र सूची हवी असल्यास प्रायोजक/जाहिरातदार पुढे येणे आवश्यक आहे.
जाहिरातीसाठी **पूर्ण पान रु. २०००, अर्ध पान रु. १०००, पाव पान रु. ६०० व शुभेच्छा ओळ रु. २००** असे शुल्क निश्चित केले आहे.

६) आपला सूचनावजा अभिप्राय कळवावा म्हणजे पुढील अंकामधे नोंद घेता येईल.
**संपर्क : श्री. सी. गो. खांबेटे,** ए-१३,संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९. **दूरध्वनी क्रमांक : ८२० ६९९४**

**शतकवीर 'मराठे'**

**दिनांक १-१-२००० म्हणजे एकविसाव्या शतकाची सुरूवात.**
आपल्या परिवारांत ज्यांचा जन्म १८९९ मध्ये (३१-१२-१९९९ पूर्वी) झाला असेल अशा म्हणजे १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या व्यक्तींची माहिती त्वरीत कळवावी. सर्व शतकोत्तरी ज्येष्ठ नागरिक 'मराठे' मंडळींना नम्र अभिवादन.

Marathe Pratishthan

सूची क्र. 1 : मध्य प्रदेश राज्य

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | **जि. बालाघाट, जि. बैतूल** | |
| 0001 | | | | 096E | श्री | मराठे | जय वासुदेव | C/O सेंट्रल स्कूल(कॉपर प्रॉजेक्ट), हिंदुस्तान कॉपर लि., मलजखंड, जि. बालाघाट 481116- M P | B1954 |
| 0002 | | | | 096F | श्री | मराठे | मंदार जयंत | –॥– | B1985 |
| 0003 | | | | 727D | श्री | चक्रदेव | अमर धोंडोपंत | C/Oवेस्टर्न कोलफील्ड्स लि., पाथरखेरा, पाथरखेरा,जि. बेतूल 460001(M P ) | B1938 |
| 0004 | | | | 727E | श्री | चक्रदेव | हृषीकेश अमर | –॥– | B1978 |
| | | | | | | | | **जि. भिलई** | |
| 0005 | | | | 460H | श्री | मराठे | सुहासकुमार लक्ष्मण | 2/6,यू को बँक स्टाफ क्वार्टर्स, बँक कॉलनी, सेक्टर 6,भिलईनगर, भिलई 490001 ( M.P.) | B1950 |
| 0006 | | | | 460J | श्री | मराठे | समीर सुहासकुमार | –॥– | B1982 |
| 0007 | | | | 460K | श्री | मराठे | पराग सुहासकुमार | –॥– | B1983 |
| 0008 | | | | 608F | श्री | मराठे | अरविंद मधुसूदन | क्वार्टर्स नं.5-ए, सेक्टर 2,स्ट्रीट नं. 2, भिलईनगर, भिलई 490001 ( M.P.) | B1955 |
| 0009 | | | | 608G | श्री | मराठे | वैभव अरविंद | –॥– | B1984 |
| 0010 | | | | 608N | श्री | मराठे | दिनकर महादेव | क्वार्टर्स नं.3-ई, सेक्टर 6,स्ट्रीट नं. 2, ब्लॉक 6के, एवेन्यू सी, भिलई 490001 ( M.P.) | B1936 |
| | | | | | | | | **जि. भोपाळ** | |
| 0011 | | | | 025C | श्री | मराठे | दीपक दिनकर | 54, मधुबन सोसायटी, कोल्हे फिसा, भोपाल 462001 ( M.P.) | B1952 |
| 0012 | | | | 025D | श्री | मराठे | अभिनव दीपक | –॥– | B1980 |
| 0013 | | 2898 | 538 | 240G | श्री | मराठे | मुकुल माधवराव | सेंट्रल बँक ऑफिसर्स क्वार्टर्स, 51, अरेरा हिल्स, होशंगाबाद रोड, भोपाल 462001 ( M.P.) | B1957 |
| 0014 | | | | 345B | श्री | मराठे | अनंत भालचंद्र | इब्राहिमगंज , भोपाल 462001 ( M.P.) | B1940 |
| 0015 | | | | 082N | श्री | मराठे | जनार्दन महादेव | क्वार्टर नं- इरिगेशन-जी-11, शास्त्री नगर, भोपाल 462003 ( M.P.) | B1936 |
| 0016 | | | | 082P | श्री | मराठे | श्रीपाद जनार्दन | –॥– | B1962 |
| 0017 | | | | 082Q | श्री | मराठे | प्रसन्न जनार्दन | –॥– | B1974 |
| 0018 | | | | 230H | डॉ | मराठे | अजित वसंत | 153, साई निवास, आराधना नगर, कोटरा, भोपाल 462003 ( M.P.) | B1963 |
| 0019 | | | | 230H1 | श्री | मराठे | निखिल अजित | –॥– | B1993 |
| 0020 | | | | 671D | श्री | खांबेटे | धनंजय जनार्दन | भोपाल 462003 ( M.P.) | B1971 |
| 0021 | | 2059 | 254 | 096G | श्री | मराठे | लक्ष्मण गोपाळ | ई-2/ 192, अरेरा कॉलनी, महावीरनगर, भोपाल 462016 ( M.P.) | B1922 |
| 0022 | | | | 186B | श्री | मराठे | नितीन अरविंद | 845,डी-2 टाईप, सेक्टर -डी, B H E L, पिपलानी, भोपाल 462021 ( M.P.) | B1966 |
| 0023 | | | | 186C | श्री | मराठे | आलोक अरविंद | –॥– | B1980 |
| 0024 | | | | 024D | श्री | मराठे | राजाराम विश्वनाथ | प्लॉट सं.235, अशोक गार्डन कॉलनी, गोविंदपुरा, रायसेन रोड, भोपाल 462023 ( M.P ) | B1938 |
| 0025 | | | | 027H | श्री | मराठे | वासुदेव कृष्णराव | ब्लॉक नं 30, महाराष्ट्र सोसायटी, गोविंदपुरा, गौतमनगर, भोपाल 462023 ( M.P ) | B1929 |
| 0026 | | | | 027J | श्री | मराठे | संजय भालचंद्र | –॥– | B1962 |
| 0027 | | 2127 | 177 | 095A | श्री | मराठे | श्रीकृष्ण गणेश | 674/N/II, सेक्टर- C, B H E L, गोविंदपुरा, भोपाल 462023 ( M.P ) | B1917 |
| 0028 | | | | 095B | श्री | मराठे | अरुण श्रीकृष्ण | –॥– | B1948 |
| 0029 | | | | 095C | श्री | मराठे | प्रकाश श्रीकृष्ण | –॥– | B1951 |
| 0030 | | | | 095D | श्री | मराठे | अजय श्रीकृष्ण | –॥– | B1960 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0031 | | | | 095E | श्री | मराठे | विजय श्रीकृष्ण | 674/N/II, सेक्टर- C, B H E L, गोविंदपुरा, भोपाल 462023 ( M.P ) | B1964 |
| 0032 | | | | 230J | श्री | मराठे | यशवंत विश्वनाथ | 45 B, आदर्श सोसायटी, गोविंदपुरा, गौतमनगर, भोपाल 462023 ( M.P ) | B1915 |
| 0033 | | | | 230K | श्री | मराठे | दिलीप यशवंत | -"- | B1946 |
| 0034 | | | | 230L | श्री | मराठे | राहुल दिलीप | -"- | B1978 |
| 0035 | | | | 230M | श्री | मराठे | प्रकाश यशवंत | | B1953 |
| | | | | | | | | **जि. बिलासपूर** | |
| 0036 | | | | 087S | श्री | मराठे | उद्धव विष्णू | भडकमकर गुरुजी का मकान, दयालबाग, सिंध पंजाब बँक के सामने, बिलासपूर 495001 ( M.P.) | B1925 |
| 0037 | | | | 087U | श्री | मराठे | प्रभाकर विष्णू | -"- | B1931 |
| 0038 | | | | 087V | श्री | मराठे | दिवाकर विष्णु | -"- | B1934 |
| 0039 | | | | 608J | श्री | मराठे | सदाशिव महादेव | मराठे निवास,अमित टेलर्स के पीछे, मन्नू चौक, टिकरा पारा, बिलासपूर 495001 ( M.P.) | B1930 |
| 0040 | | | | 608K | श्री | मराठे | संतोष सदाशिव | -"- | B1970 |
| 0041 | | | | 608L | श्री | मराठे | सोमनाथ महादेव | C/Oरामराव हलबे, शकुंतला भवन, सोप फॅक्टरी के पीछे, बंधवा पारा, बिलासपूर 495001 (M.P.) | B1932 |
| 0042 | | | | 608M | श्री | मराठे | भालचंद्र सोमनाथ | -"- | B1979 |
| 0043 | | | | 738G | श्री | चक्रदेव | विश्वनाथ विठ्ठल | 62-63, चंदन आवास, राजकिशोर नगर, बिलासपूर 495001 ( M.P.) | B1946 |
| 0044 | | | | 739D | श्री | चक्रदेव | शरद विठ्ठल | -"- | B1955 |
| 0045 | | | | 739F | श्री | चक्रदेव | जयंत विठ्ठल | लोरमी, लोरमी, बिलासपूर 495001 ( M.P.) | B1961 |
| 0046 | | | | 739A | श्री | चक्रदेव | वसंत विठ्ठल | क्वार्टर 947, टाईपA, सेक्टर 5, बालको टाऊनशिप, गंगानगर, कोरबा, बिलासपूर 495667 (MP) | B1951 |
| 0047 | | | | 739B | श्री | चक्रदेव | वैभव वसंत | -"- | B1984 |
| 0048 | | | | 739C | श्री | चक्रदेव | श्रीराम वसंत | -"- | B1989 |
| | | | | | | | | **जि. दमोह, जि. देवास, जि. धार** | |
| 0049 | | | | 363A | श्री | मराठे | प्रभाकर नारायण | दामोदर टॉकीज के पास, दमोह 470661 ( M.P.) | B1935 |
| 0050 | | | | 363B | श्री | मराठे | प्रसाद प्रभाकर | -"- | B1972 |
| 0051 | | | | 363C | श्री | मराठे | प्रवीण प्रभाकर | -"- | B1976 |
| 0052 | | | | 195M | श्री | मराठे | विद्याधर वामन | माधवराव कानुंगो का मकान, 3, मोती बंगला, भारत्रीय सोसायटी, देवास 455001 ( M.P.) | B1955 |
| 0053 | | | | 195P | श्री | मराठे | प्रणव विद्याधर | -"- | B1983 |
| 0054 | | | | 672H | श्री | खांबेटे | बळवंत रामचंद्र | दत्त मंदीर, धारेश्वर रोड, धार 454001 ( M.P.) | B1912 |
| 0055 | | | | 672L | श्री | खांबेटे | विश्वनाथ बळवंत | विद्युत सोसायटी, मु.पो . मानावर, मानावर, जि.धार 454446 ( M.P.) | B1948 |
| 0056 | | | | 672M | श्री | खांबेटे | गीतेश विश्वनाथ | -"- | B1978 |
| | | | | | | | | **जि. गुणा, जि. ग्वाल्हेर** | |
| 0057 | | | | 445M | श्री | मराठे | श्रीधर गोविंद | आपका, अपना दवाखाना, मु.पो. मुंगवली, मुंगवली जि. गुणा 473443 ( M.P.) | B1947 |
| 0058 | | | | 445N | श्री | मराठे | सौरभकुमार श्रीधर | -"- | B1978 |
| 0059 | | | 595 | 230B1 | श्रीम | कवडीकर | कल्पना केशव | कवडीकर वाडारॉक्सी टॉकीज के पास, लष्कर, ग्वालियर 474001 (M P) | B1940 |
| 0060 | | | | 344A | श्री | मराठे | लक्ष्मण भालचंद्र | वाकडे की गोठ, लालाका बाजार, लष्कर, ग्वालियर 474001 (M P) | B1922 |
| 0061 | | | | 345A | श्री | मराठे | अनिलकुमार लक्ष्मण | -"- | B1952 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0062 | | | | 345C | श्री मराठे | मनोहर भालचंद्र | वाकडे की गोठ, लालाका बाजार, लष्कर, ग्वालियर 474001 (M P) | B1943 |
| 0063 | | | | 345D | श्री मराठे | मिलिंद मनोहर | –॥– | B1973 |
| 0064 | | | | 445E | श्री मराठे | श्रीराम हरी | उदाजी का पायगा, जनक गंज, लष्कर, ग्वालियर 474001 (M P) | B1908 |
| 0065 | | | | 445F | श्री मराठे | नारायण श्रीराम | –॥– | B1943 |
| 0066 | | | | 445G | श्री मराठे | आलोक नारायण | –॥– | B1970 |
| 0067 | | | | 445H | श्री मराठे | अखिल नारायण | –॥– | B1972 |
| 0068 | | | | 483A | श्री मराठे | गोविंद काशिनाथ | मराठे वाडा, आपटे पागा, लष्कर, चित्रा टाकीज के पास, नई सडक, ग्वालियर 474001 (M P) | B1930 |
| 0069 | | | | 483B | श्री मराठे | रामचंद्र काशिनाथ | –॥– | B1932 |
| 0070 | | | | 483C | श्री मराठे | चित्तरंजन रामचंद्र | –॥– | B1962 |
| 0071 | | | | 534P | श्री मराठे | रघुनाथ लक्ष्मण | ग्वालियर, 474001 (M P) | B1912 |
| 0072 | | | | 534Q | श्री मराठे | मनोहर रघुनाथ | –॥– | B1942 |
| 0073 | | | | 534R | श्री मराठे | सुधाकर रघुनाथ | –॥– | B1945 |
| 0074 | | | | 534S | श्री मराठे | प्रभाकर रघुनाथ | –॥– | B1948 |
| 0075 | | | | 445J | डॉ मराठे | गोविंद हरी | ब्लॉक 49/50, चंद्रप्रस्थ, मोरार-6ग्वालियर 474006 (M.P.) | B1910 |
| 0076 | | | | 445K | श्री मराठे | अरविंद गोविंद | –॥– | B1938 |
| 0077 | | | | 445L | श्री मराठे | अतुल अरविंद | –॥– | B1970 |
| 0078 | | | | 240A | श्री मराठे | केशव रामचंद्र | 574, सुरेशनगर, थाटीपूर, ग्वालियर 474011 ( M.P.) | B1914 |
| 0079 | | | | 240B | श्री मराठे | सुशीलकुमार केशव | 36, टाईप IV, शास्त्रीनगर,AGO कॉल.थाटीपूर, पो. रामकृष्णपुरी ग्वालियर 474011 (M.P.) | B1948 |
| 0080 | | | | 240C | श्री मराठे | श्रीराम सुशीलकुमार | 154, टाईप IV, शास्त्रीनगर,AGO कॉल.थाटीपूर, पो. रामकृष्णपुरी ग्वालियर 474011 (M.P.) | B1977 |
| 0081 | | | | 240D | श्री मराठे | सौमित्र सुशीलकुमार | –॥– | B1979 |
| 0082 | | | | 240M | श्री मराठे | वामनराव रामचंद्र | 574, सुरेशनगर, थाटीपूर, ग्वालियर 474011 (M.P.) | B1935 |
| 0083 | | | | 241A | श्री मराठे | राजीव वामनराव | –॥– | B1967 |
| 0084 | | | | 241B | श्री मराठे | संजीव वामनराव | –॥– | B1971 |
| 0085 | | | | 445C | श्री मराठे | विश्वनाथ गजानन | मराठे भवन, मराठे रोड, धीमरपुरा, मु पो. डबरा, जि.ग्वालियर 475110 ( M.P.) | B1940 |
| 0086 | | | | 445D | श्री मराठे | विजय विश्वनाथ | –॥– | B1976 |
| 0087 | | | | 240E | श्री मराठे | यशवंत केशव | सेनवेस्टो, टेकनपूर, B. S. F., टेकानपूर, जि. ग्वालियर 475005-M P | B1951 |
| 0088 | | | | 240F | श्री मराठे | हिमांशु यशवंत | –॥– | B1980 |

### जि. इंदूर

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0089 | | | | 028A | श्री मराठे | गोविंद नारायण | 70, ब्रुक बॉंड कॉलनी, माणिकबाग रोड, विवेकानंद रोड, इंदौर 452001 (M P) | B1914 |
| 0090 | | | | 028B | श्री मराठे | अनिल गोविंद | –॥– | B1942 |
| 0091 | | | | 028C | श्री मराठे | जयदीप अनिल | –॥– | B1969 |
| 0092 | | | | 028D | श्री मराठे | निखिल अनिल | –॥– | B1979 |
| 0093 | | | | 028F | श्री मराठे | ललित अनिल | –॥– | B1981 |
| 0094 | | | | 028G | श्री मराठे | अनंत गोविंद | 70, ब्रुक बॉंड कॉलनी, माणिकबाग रोड, विवेकानंद रोड, इंदौर 452001 (M P) | B1945 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0095 | | | | 028H | श्री मराठे | चैतन्य अनंत | 70, ब्रुक बाँड कॉलनी, माणिकबाग रोड, विवेकानंद रोड, इंदौर 452001 (M P) | B1975 |
| 0096 | | | | 670A | श्री खांबेटे | कृष्णराव निळकंठ | डॉ.ऋषी बंगला, नारायण बाग, इंदौर 452001 (M P) | B1970 |
| 0097 | | | | 671C* | श्री खांबेटे | पुरुषोत्तम वासुदेव | 6/28, मल्हार गंज, इंदौर 452001 (M P) | B1950 |
| 0098 | | | | 671L | श्री खांबेटे | प्रभाकर रघुनाथ | 711, समाज़वादी इंदिरानगर, इंदौर 452001 (M P) | B1947 |
| 0099 | | | | 671M | श्री खांबेटे | अविनाश प्रभाकर | -॥- | B1973 |
| 0100 | | | | 671N | श्री खांबेटे | आशिष प्रभाकर | -॥- | B1975 |
| 0101 | | | | 672J | श्री खांबेटे | भालचंद्र बळवंत | 20,नंदनवन, (ब्रुक बाँड कॉलनी), विवेकानंद नगर, माणिकबाग रोड, इंदौर 452001 (M P) | B1937 |
| 0102 | | | | 672K | श्री खांबेटे | संजय भालचंद्र | -॥- | B1968 |
| 0103 | | | | 681A | श्री खांबेटे | गोविंद गोपाळ | इंदौर 452001 (M P ) | B1921 |
| 0104 | | | | 025E | श्री मराठे | भास्कर शंकर | 2/9, परदेशी पुरा, मेन रोड, इंदौर 452002 (M P) | B1928 |
| 0105 | | | | 025H | श्री मराठे | प्रभाकर शंकर | -॥- | B1937 |
| 0106 | | | | 025J | श्री मराठे | मनोज प्रभाकर | -॥- | B1974 |
| 0107 | | | | 026R | श्री मराठे | सुधाकर गोपाळ | 200/8, ब्लॉक, मीनाक्षी अपार्टमेंट ,दूसरा मजला, नारायण बाग, इंदौर 452002 (M P) | B1943 |
| 0108 | | | | 234B | श्री मराठे | अरविंद नारायण | 277, लोकमान्य नगर, इंदौर 452002 (M P) | B1936 |
| 0109 | | | | 234C | श्री मराठे | अजय अरविंद | -॥- | B1969 |
| 0110 | | | | 234D | श्री मराठे | अविनाश अरविंद | -॥- | B1971 |
| 0111 | | | | 234G | श्री मराठे | राजेंद्र नारायण | 275, लोकमान्य नगर, इंदौर, इंदौर 452002 (M P) | B1952 |
| 0112 | | | | 234H | श्री मराठे | अभिषेक राजेंद्र | -॥- | B1984 |
| 0113 | | | | 234J | श्री मराठे | अंकुर राजेंद्र | -॥- | B1986 |
| 0114 | | | | 022A | श्री मराठे | प्रभाकर दत्तात्रय | इंदौर 452004 (M P) | B1951 |
| 0115 | | | | 022B | श्री मराठे | रजत प्रभाकर | -॥- | B1979 |
| 0116 | | | | 027A | श्री मराठे | विजय सिद्धनाथ | 167, टिळक पथ, इंदौर 452004 (M P) | B1956 |
| 0117 | | | | 027B | श्री मराठे | योगेश विजय | -॥- | B1984 |
| 0118 | | | | 027C | श्री मराठे | विनय सिद्धनाथ | -॥- | B1961 |
| 0119 | | | | 029H | श्री मराठे | प्रभाकर भास्कर | 22, टिळक पथ, कृष्णपुरा, इंदौर 452004 (M P) | B1917 |
| 0120 | | | | 029J | श्री मराठे | चिंतामणि भास्कर | -॥- | B1927 |
| 0121 | | | | 029K | श्री मराठे | चंद्रशेखर चिंतामण | 25, गणेश कॉलनी, इंदौर, इंदौर 452004 (M P) | B1953 |
| 0122 | | | | 029L | श्री मराठे | रोहित चंद्रशेखर | -॥- | B1984 |
| 0123 | | | | 029M | श्री मराठे | श्रीकांत चिंतामण | -॥- | B1955 |
| 0124 | | | | 029N | श्री मराठे | सौरभ श्रीकांत | -॥- | B1986 |
| 0125 | | | | 029P | श्री मराठे | सूर्यकांत चिंतामण | -॥- | B1957 |
| 0126 | | | | 029Q | श्री मराठे | स्वप्नील सूर्यकांत | -॥- | B1984 |
| 0127 | | | | 029R | श्री मराठे | दिलीप चिंतामण | -॥- | B1959 |
| 0128 | | | | 029S | श्री मराठे | श्रीपाद भास्कर | 53/2, नंदलाल पुरा, मेन रोड, टेलिग्राफ कार्यालयके पास, इंदौर 452004 (M P) | B1937 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0129 | | | | 274A | श्री | मराठे | विष्णू श्रीधर | 157, टिळक पथ, इंदौर 452004 (M P) | B1920 |
| 0130 | | | | 274B | श्री | मराठे | चंद्रशेखर विष्णू | 157, टिळक पथ, मल्हार आश्रम शाला मैदाना समोर, इंदौर 452004 (M P) | B1958 |
| 0131 | | | | 274C | श्री | मराठे | रोहित चंद्रशेखर | –״– | B1984 |
| 0132 | 535864 | | | 670E | श्री | खांबेटे | वसंत दिनकर | 140, पंढ़रीनाथ मार्ग, आडा बाजार, प्रज्ञानंद निवास, इंदौर 452004 (M P) | B1948 |
| 0133 | 433378 | | | 670F | डॉ | खांबेटे | शरद दिनकर | –״– | B1952 |
| 0134 | | | | 670G | श्री | खांबेटे | मनोज शरद | –״– | B1981 |
| 0135 | | | | 670H | श्री | खांबेटे | हेमंत शरद | –״– | B1984 |
| 0136 | | | | 670J | श्री | खांबेटे | विष्णू निळकंठ | –״– | B1921 |
| 0137 | | | | 671P | श्री | खांबेटे | किरण शंकर | 26/B, चंद्रनगर कालनी, इंदौर 452004 (M P) | B1959 |
| 0138 | | | | 672A | श्री | खांबेटे | राहुल किरण | –״– | B1989 |
| 0139 | | | | 672B | श्री | खांबेटे | अरुण शंकर | –״– | B1964 |
| 0140 | | | | 672C | श्री | खांबेटे | प्रकाश शंकर | –״– | B1966 |
| 0141 | | | | 672D | श्री | खांबेटे | अनिरुद्ध नारायण | 41,नारायण बाग, इंदौर 452004 (M P) | B1941 |
| 0142 | | | | 672E | श्री | खांबेटे | अनिल नारायण | –״– | B1948 |
| 0143 | | | | 672F | श्री | खांबेटे | आशुतोष अनिल | –״– | B1978 |
| 0144 | | | | 672G | श्री | खांबेटे | आनंद अनिल | –״– | B1980 |
| 0145 | | | | 736B | श्री | चक्रदेव | त्रिविक्रम गणेश | 10,स्नेहलता गंज, इंदौर 452004 (M P) | B19 |
| 0146 | | | | 736C | श्री | चक्रदेव | पुरुषोत्तम त्रिविक्रम | –״– | B1926 |
| 0147 | | | | 736D | श्री | चक्रदेव | मकरंद मधुसूदन | –״– | B1931 |
| 0148 | | | | 736E | श्री | चक्रदेव | माधव त्रिविक्रम | –״– | B1934 |
| 0149 | | | | 736F | श्री | चक्रदेव | शिवराम गणेश | –״– | B1928 |
| 0150 | | | | 756K | श्री | जाईल | माधव त्र्यंबक | 205, टिळक पथ, आपटे यांचे घर, इंदौर 452004 (M P) | B1916 |
| 0151 | | | | 757E | श्री | जाईल | श्रीराम माधव | –״– | B1955 |
| 0152 | | | | 757F | श्री | जाईल | नितीन श्रीराम | –״– | B1989 |
| 0153 | | | | 025F | श्री | मराठे | नवीन भास्कर | 40, मधुबन कॉलनी, केसरबाग रोड, इंदौर 452009 (M P) | B1962 |
| 0154 | | | | 025G | श्री | मराठे | नितीन भास्कर | –״– | B1964 |
| 0155 | | | | 026J | श्री | मराठे | चंद्रकांत महादेव | 39, मधुबन कॉलनी, केसरबाग रोड, इंदौर 452009 (M P) | B1951 |
| 0156 | | | | 026L | श्री | मराठे | संजय चंद्रकांत | –״– | B1986 |
| 0157 | | | | 026M | श्री | मराठे | केशव पुरुषोत्तम | –״– | B1912 |
| 0158 | | | | 026N | श्री | मराठे | दिवाकर विष्णु | 245, लोकमान्य नगर, इंदौर 452009 (M P) | B1955 |
| 0159 | | | | 026P | श्री | मराठे | रत्नाकर विष्णू | –״– | B1957 |
| 0160 | | | | 026Q | श्री | मराठे | अरविंद विष्णू | –״– | B1959 |
| 0161 | | | | 082H | श्री | मराठे | विष्णू महादेव | 39, रवींद्र नगर, पलासिया, इंदौर 452009 (M P) | B1922 |
| 0162 | | | | 082J | श्री | मराठे | सदानंद विष्णू | –״– | B1952 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0163 | | | | 082K | श्री मराठे | पुरुषोत्तम सदानंद | 39, रवींद्र नगर, पलासिया, इंदौर 452009 (M P) | B1982 |
| 0164 | | | | 082M | श्री मराठे | संजय प्रभाकर | -॥- | B1970 |
| 0165 | | | | 195L | श्री मराठे | वामन देविदास | 107, शिवगौरी, सिल्व्हर ओक कॉलनी, अन्नपूर्णा रोड, पो. सुदामा नगर, इंदौर 452009 (M P) | B1927 |
| 0166 | | | | 195Q | श्री मराठे | भालचंद्र वामन | -॥- | B1956 |
| 0167 | | | | 195R | श्री मराठे | वैभव भालचंद्र | -॥- | B1983 |
| 0168 | | | | 025B | श्री मराठे | रवींद्र गोविंद | सेंटर फॉर एडव्हान्स्ड टेक्नॉ. (CAT), पो. C A T, BARC, इंदौर 452013 (M P) | B1960 |

**जि. जबलपूर**

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0169 | | | | 226C | श्री मराठे | दत्तात्रय पुरुषोत्तम | B-10, रतन नगर, पो.प्रेमनगर, मदनमहाल, जबलपूर, 482001 (M.P.) | B1935 |
| 0170 | | | | 226C3 | श्री मराठे | परिक्षित शामकांत | -॥- | B1977 |
| 0171 | | | | 226C4 | श्री मराठे | अभिजित श्यामकांत | -॥- | B1979 |
| 0172 | | | | 460D | श्री मराठे | सुरेशचंद्र लक्ष्मण | फिटर-B MT/79/54420, ऑर्डिनन्स फॅक्टरी, खमारिया, जबलपूर, 482001 (M.P.) | B1943 |
| 0173 | | | | 027K | श्री मराठे | नारायण कृष्णराव | 353, स्टेट बँक कॉलनी, चरिटल वार्ड, बलदेवबाग, जबलपूर, 482002 (M.P.) | B1944 |
| 0174 | | | | 232E | श्री मराठे | विष्णू गंगाधर | जे बी बगद देव वाडा, 823, टेलि. गेट नं 2, राईट टाऊन, जबलपूर, 482002 (M.P.) | B1931 |
| 0175 | | | | 232F | श्री मराठे | निळकंठ विष्णू | जे बी बगद देव वाडा, 823, टेलि. गेट नं 2, राईट टाऊन, जबलपूर, 482002 (M.P.) | B1960 |
| 0176 | | | | 237B | श्री मराठे | गंगाधर सदाशिव | ग्राम सुहागी, पो. आधारतल, जबलपूर, 482004 (M.P.) | B1917 |
| 0177 | | | | 237C | श्री मराठे | मोरेश्वर गंगाधर | -॥- | B1947 |
| 0178 | | | | 237D | श्री मराठे | कौस्तुभ मोरेश्वर | -॥- | B1977 |
| 0179 | | | | 237E | श्री मराठे | मंगेश गंगाधर | -॥- | B1977 |
| 0180 | 312932 | | | 296A | श्री मराठे | दत्तात्रय पुरुषोत्तम | श्रमसाफल्य, टागोरनगर, ग्वारीघाट रोड, पोलिपाथर, जबलपूर, 482008 (M.P.) | B1934 |
| 0181 | 312932 | | | 297A | श्री मराठे | स्वशीन दत्तात्रय | -॥- | B1973 |
| 0182 | | | | 460E | श्री मराठे | सुभाषकुमार लक्ष्मण | 770,खानदारी वार्ड, जनता स्कूल जवळ, मंडला रोड, बिहारी, जबलपूर, 482020 (M.P.) | B1948 |
| 0183 | | | | 460F | श्री मराठे | सचिन सुभाषकुमार | -॥- | B1981 |
| 0184 | | | | 460G | श्री मराठे | संदीप सुभाषकुमार | -॥- | B1983 |
| 0185 | | | | 096C | श्री मराठे | सुहास वासुदेव | C/O ए.सी.सी.लि., एडमिनिस्ट्रेटिव ऑ., कैमोर सिमेंट फॅ., कैमोर,जि, जबलपूर 483886 (M P) | B1951 |
| 0186 | | | | 096D | श्री मराठे | गौरव सुहास | -॥- | B1984 |
| 0187 | | | | 226D | श्री मराठे | दामोदर पुरुषोत्तम | 505, विश्वकर्मा का मकान, शांतिनगर, विकल रोड, विकल-राझी, जबलपूर (M P) | B1918 |
| 0188 | | | | 226D1 | श्री मराठे | चंद्रकांत दामोदर | -॥- | B1948 |

**जि. मंदसौर, जि. रतलाम**

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपक्र. | आडनाव | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0189 | | | | 671G | श्री खांबेटे | मधुसूदन रघुनाथ | शिवकृपा बिल्डिंग, 32, माथुर कॉलनी, मंदसौर 458001 (M P) | B1938 |
| 0190 | | | | 671H | श्री खांबेटे | मिलिंद मधसूदन | -॥- | B1966 |
| 0200 | | | | 671J | श्री खांबेटे | मकरंद मधुसूदन | -॥- | B1968 |
| 0201 | | | | 671K | श्री खांबेटे | मनीष मधुसूदन | -॥- | B1975 |
| 0202 | | | | 670B | श्री खांबेटे | रामचंद्र कृष्ण | जावरा, जि. रतलाम 457226( M.P.) | B1945 |
| 0203 | | | | 670C | श्री खांबेटे | चैतन्य रामचंद्र | -॥- | B1975 |

Marathe Pratishthan

| अ. क्र. | दूरध्वनी | आसक्र. | हिवक्र. | कुपृक्र. | आडनाव | | नाव | पत्ता | जन्म वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | **जि. राजगढ़, जि. राजनांदगाव** | |
| 0204 | | | | 096H | श्री | मराठे | माधव गोपाळ | गवर्नमेंट क्वार्टर नं 5. शहीद पार्क. पो. ब्यावरा. ब्यावरा. जि, राजगढ़ 465671 (M.P.) | B1935 |
| 0205 | | | | 096J | श्री | मराठे | अतुलकुमार माधव | -॥- | B1971 |
| 0206 | | | | 224D | श्री | मराठे | अनिल महादेव | राजनांदगाव 491441 ( M.P.) | B1945 |
| 0207 | | | | 224E | श्री | मराठे | आशिष अनिल | -॥- | B1974 |
| | | | | | | | | **जि. रायपूर, जि. रायसेन, जि. सतना** | |
| 0208 | | | | 224C | श्री | मराठे | महादेव गोविंदराव | गंगारामनगर. राम कुंड. रायपूर 492001 (M P) | B1914 |
| 0209 | | | | 224F | श्री | मराठे | अशोक महादेव | -॥- | B1950 |
| 0210 | | | | 224G | श्री | मराठे | किशोर महादेव | -॥- | B1956 |
| 0211 | | | | 156D | श्री | मराठे | दत्तात्रय कृष्णाजी | 24/513, बाळासाहेब राजिमवाले वांडा, हनुमान मंदिराजवळ, तात्या पारा, रायपूर 492007 (M P) | B1955 |
| 0212 | | | | 156E | श्री | मराठे | तुषार दत्तात्रय | -॥- | B1987 |
| 0213 | | | | 241H | श्री | मराठे | विजय नारायण | N-6, अनुपम नगर, रायपूर 492007 (M P) | B1944 |
| 0214 | | | | 241J | श्री | मराठे | निखिल विजय | -॥- | B1976 |
| 0215 | | | | 241K | श्री | मराठे | रंजन विजय | -॥- | B1980 |
| 0216 | | | | 241L | श्री | मराठे | आनंद नारायण | -॥- | B1958 |
| 0217 | | | | 242A | श्री | मराठे | चंद्रशेखर प्रभाकर | C/173, L I G कॉलनी. टिळक नगर. (शंकरनगर?) गुढ़ी सारी, रायपूर 492007 (M P) | B1957 |
| 0218 | | | | 242B | श्री | मराठे | मिलिंद चंद्रशेखर | -॥- | B1986 |
| 0219 | | | | 242C | श्री | मराठे | प्रकाश प्रभाकर | -॥- | B1959 |
| 0220 | | | | 242C1 | श्री | मराठे | प्रणव प्रकाश | | B1989 |
| 0221 | | | | 096K | श्री | मराठे | मुकुंद गोपाळ | C/O, प्रिन्सिपल. हायर सेकंडरी स्कूल, बाडी (बरेली ). बाडी. जि. रायसेन 464551 (M.P.) | B1935 |
| 0222 | | | | 096L | श्री | मराठे | विवेक मुकुंद | -॥- | B1967 |
| 0223 | | | | 455K | श्री | मराठे | रामचंद्र मधुसूदन | डे स्पिनिंग मास्टर. प्लॉट नं 1A. न्यू इंडस्ट्रीयल एरिया, मंडीदीप. जि. रायसेन 462046 (M.P.) | B1968 |
| 0224 | | | | 242M | श्रीम | मराठे | मृदुला रमेश | C/O पी जी फाटक रिटायर्ड रेलवे गार्ड, जय स्त्रंभ के पास. धवरी. सतना. 485001 (M.P.) | B1947 |
| | | | | | | | | **जि. उज्जैन** | |
| 0225 | | | | 226E | श्री | मराठे | वसंत पुरुषोत्तम | गंगोत्री, C-7/19. ऋषी नगर. उज्जैन 456010 (M.P.) | B1924 |
| 0226 | | | | 226E+ | श्री | मराठे | अजय वसंत | -॥- | B1954 |
| 0227 | | | 593 | 226E1 | श्री | मराठे | अभय वसंत | -॥- | B1957 |
| 0228 | | | 594 | 226E2 | श्री | मराठे | अरुण वसंत | A-27/5. वेदनगर नानाखेरा, सावेर रोड. उज्जैन 456010 (M.P.) | B1960 |
| 0229 | | | | 226E3 | श्री | मराठे | स्वप्नील अरूण | -॥- | B1990 |
| 0230 | | | | 240H | श्री | मराठे | पुरुषोत्तम रामचंद्र | इंजिनियर. ग्रासिम. 45/2. स्टाफ कॉलनी. बिरला ग्राम. नागदा. जि उज्जैन 456331 (M.P.) | B1931 |
| 0231 | | | | 240J | श्री | मराठे | श्रीकांत पुरुषोत्तम | -॥- | B1959 |

**टीप :-** (1) आसक्र. - आजीव सभासद क्रमांक (2) हिवक्र. - हितगुज वर्गणीदार क्रमांक (3) कुपृक्र. - कुलवृत्तांत पृष्ठ क्रमांक



Marathe Pratishthan

परिसंवाद

# हे दुष्टचक्र कोण कसे व कधी भेदणार?

***मागील अंकातील आवाहनाला प्रतिसाद म्हणून सुविद्य व सुशिक्षित मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने काय करता येईल याबाबत वाचकांनी व्यक्त केलेले विचार.***

## मतदान करणे कायद्याने बंधनकारक असावे

**हेमंत अरुण** (पृ. २१), नालासोपारा

सुविद्य व सुशिक्षित मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी बऱ्याच गोष्टी करता येतील. परंतु पहिल्यांदा ते मतदानाबाबत उदासीन का असतात ते पाहू.

आपल्याकडे साधारणपणे अशिक्षित लोकांचे मतदानाचे प्रमाण जास्त असते. कारण त्यांच्या गरजा मर्यादित असतात. जो उमेदवार त्यांना पटेल असे आमिष दाखवतो, (प्रत्यक्षात त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा कोणताही उमेदवार प्रयत्न करत नाही) त्याला ते मत देतात. परंतु सुशिक्षित, पगारदार लोकांचे तसे नसते. त्यांना आर्थिक विवंचना कमी असतात; परंतु व्यवहारात बऱ्याच अडचणी असतात. हे मतदार मतदानामध्ये उदासीन असण्याची मुख्य कारणे म्हणजे,

१) वारंवार मतदान आल्याने आलेली उदासीनता.

२) जे कोणी उमेदवार निवडून येतात ते पुन्हा पुढच्या मतदानापर्यंत मतदाराकडे जात नाहीत.

३) एकदा निवडून आल्यानंतर ते फक्त स्वतःचा स्वार्थच पहात असतात. जनतेच्या फायद्याचे काम करावयाचे झाल्यास त्यातही आपला फायदा किती ह्याचा हिशेब अगोदर होतो. म्हणजेच जनतेचे काम कमी करावयाचे, मात्र जाहिरात अशी करायची की आपण फार मोठे काम केले.

यामुळे सुशिक्षित मतदार मतदान करत नाहीत. मात्र त्यामुळे कोणीतरी उमेदवार निवडून येतो. त्यांचे मतदानाचे प्रमाण वाढावयास हवे असल्यास पुढील गोष्टी करता येतील.

१) पक्षसंख्येवर बंधन हवे.

२) पक्षबदल करण्यावर कायद्याने बंधन आणणे.

३) कोणत्याही सभागृहाचे मतदान त्याची मुदत पूर्ण झाल्यानंतरच घेण्यात यावे. त्यासाठी अविश्वास ठराव आणणाऱ्या पक्षास प्रथम सरकार स्थापनेसाठी बहुमत सिद्ध करण्यास सांगणे.

४) 'राजकारण' या विषयामधे पदविका अभ्यासक्रम सुरू करावा. म्हणजे जो कोणी हा अभ्यासक्रम पूर्ण केला असेल त्यालाच निवडणुकीसाठी उभे राहता येईल.

५) राजकारणी लोकांच्या उत्पन्नावर अंकुश असावा.

६) मतदान करणे हे कायद्याने बंधनकारक असावे.

७) मतदान जास्तीत जास्त होण्यासाठी मतदाराला कोणत्याही ठिकाणी मतदान करता यायला हवे. त्यासाठी काही ओळखपत्र असावे.

एवढे केल्यानंतर मला वाटते मतदानाचे प्रमाण ९०% च्या आसपास नक्की जाईल.

★★★

योग्य त्या अंतराने आणि योग्य वेळी निवडणुका झाल्यास ७०/७५% मतदान होते. यावरून शिक्षित मतदार मतदानापासून दूर रहातो असे म्हणणे योग्य होणार नाही. उच्चशिक्षित लोक मात्र मतदानापासून अलिप्त रहातात. त्यांनी मतदान केले अथवा केले नाही, तरी फारसा फरक पडणार नाही. अशिक्षितांना आपण उगाचच दोष देतो. त्यांच्यापुढे तरी कोणता पर्याय असतो? आपण समजतो तितका तो भोळा किंवा अडाणी नाही. अनेक वेळा त्यांनी प्रस्थापितांविरुद्ध मतदान करून आपली कामगिरी चोख बजावलेली आहे. त्यांच्या मतदानामुळे चुकीचा उमेदवार निवडून येतो व शिक्षितांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले तर चांगला उमेदवार निवडून येईल हा समज चुकीचा आहे.

भारतात शिक्षित मतदाता मतदानापासून अलिप्त का रहातो याची काळजी करण्यापेक्षा, संपत्ती व सत्ता यांच्या जोरावर निवडणुका लढविल्या जातात व निवडून आल्यानंतर पुनः संपत्ती व सत्ता मिळविण्यासाठी त्याचा वापर केला जातो. याच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जागृती होणे जरूर आहे. काही चांगले उमेदवार निवडून येऊन ते यात बदल घडवू शकणार नाहीत. सारेच पक्ष याच मार्गाने जातात असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते.

## उमेदवार सूज्ञ व सुसंस्कारित असावे

**वसंत रावजी** (पृ. ११७), पाटवाडी, खुडी, जि. सिंधुदुर्ग

सर्वच राजकीय पक्षांनी अतिशय काटेकोरपणे आपला उमेदवार सुसंस्कारित असेल, तो कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचारात, गुन्ह्यात सहभागी नसेल, तसेच आपल्या देशावर त्याची निष्ठा असेल असाच निवडला पाहिजे. प्रचार करताना या गोष्टीवर भर देऊन प्रचार झाला पाहिजे. निवडणूक जाहीरनाम्यात ही बाब जोरदारपणे मांडली पाहिजे म्हणजे 'सूज्ञांची निवडणूक' अशी स्थिती निर्माण होईल. यामुळे निवडणुकांबद्दल मतदात्यांना आस्था वाटेल व सर्व थरातील मतदार मतदानासाठी बाहेर पडतील.

सध्याच ही गोष्ट शक्य नाही, परंतु आजच्या तरुण मतदारांना सुसंस्कारित करून त्यांच्या मनावर निवडणूक म्हणजे सत्ता आणि संपत्ती मिळविण्याचे साधन नाही, तर ती चांगले काम करण्याची संधी आहे, असे बिंबविणे गरजेचे आहे. हे काम सर्व सूज्ञ पालकांनी करावे.

★★★

### खुषीपत्र

सप्टेंबरचा अंक सर्वांगीण सुंदर वाटला. तुमचे आणि तुमचे सहकारी यांचे अथक प्रयत्न त्यामागे आहेत याची जाणीव होते.

- **यशवंत लक्ष्मण** (पृ. १०१), विंग कमांडर (निवृत्त), पुणे



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. जिथे पत्ता दिलेला नाही त्यांचे बाबतीत 'विवाह सहाय्य' असे लिहिलेले बंद पाकीट, ल. शं. मराठे, संपादक हितगुज, अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१ या पत्त्यावर पाठवावे. ते संबंधिताकडे पोचवले जाईल. - संपादक.*

**क्र. १/१९९९ वर**: जितेंद्र अनंत लेले, बी. कॉम., एल. एल. बी., अलिबाग येथे वकिली. जन्म ४-३-७०, उंची ५'६'', वर्ण गोरा, मंगळ आहे, पत्रिका हवी, रक्तगट O Rh +ve अपेक्षा: कोकणस्थ, सुंदर, किमान पदवीधर, अलिबागला रहाण्याची तयारी, नोकरी असल्यास उत्तम. संपर्कः अनिल गणेश (पृ. ५५७), १०५, गगन विहार, पाटीलपाडा, कुळगांव (बदलापूर) पूर्व ४२१५०३. (फोनः ९११-६९३३०१४)

**क्र. २/१९९९ वर** : प्रसाद पांडुरंग, आय्.टी.आय्. मॅकेनिकल ड्राफ्टस्मन, कंप्युटर कॅड कोर्स (फर्स्ट क्लास), अंधेरीला खाजगी कंपनीत नोकरी, पगार-४५००/-. जन्म २०.१०.७३, उंची ५'७'', रास -कर्क, गोत्र-कपि, वडील निवृत्त केंद्र सरकारी पेन्शनर, आर्थिक स्थिती उत्तम, स्वतःच्या मालकीचा फ्लॅट, मुलाला भाऊ-बहिण नाही. आई पण नाही. **अपेक्षा** : सुस्वभावी, घरात काम करणारी, कुळधर्म, कुळाचार पाळणारी. संपर्क : पांडुरंग महादेव (पृ. ८८), १४ ब, विशाल अपार्टमेंटस्, शंकर मंदिरांसमोर, भाटीबंदर रस्ता, आगाशी, ता. वसई, जि. ठाणे - ४०१ ३०१.

**क्र. ३/१९९९ वधू** : योगिनी प्रभाकर देशमुख, बी.एस्सी. (स्टॅटिस्टिक्स), पुण्यात कॉसमॉस को-बँकेत नोकरी. जन्म १३.३.१९६६, गहू वर्ण, उंची ५'-२'', मंगळ नाही. काश्यप गोत्र, राक्षस गण, आद्य नाडी, वृश्चिक रास, आई-वडील व मोठी एक बहिण (विवाहित). **अपेक्षा** : पुण्यातील कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेतील, वय ३४-४०, **संपर्क** : प्रभाकर दिगंबर देशमुख, २६७, बुधवार पेठ, श्रीकृष्ण टॉकीजशेजारी, पुणे-४११००२. (सौ. नीलांबरी रमेश, पृ. २८० यांचेमार्फत.)

**क्र. ४/१९९९ वधू** : बी.ए. इंग्लिश (डिस्टिंक्शन), पुण्यात जर्मन डिप्लोमा चालू, कॉम्प्युटर मल्टिमिडीया पूर्ण, त्याच संस्थेत नोकरी. टेबल टेनिस युनिव्हर्सिटी प्लेअर, गाणे, पेंटींग, वाचनाची आवड, गोत्र-कपि, रास-मकर, अंत्य नाडी, रक्तगट ओ आरएच पॉझिटिव्ह, उंची ५'-५'', जन्म २९.१०.१९७६, चष्मा नाही. मध्यम रंग व बांधा. आई गृहिणी, वडील इंजिनियर, स्वतःचा व्यवसाय हुबळी येथे. २ विवाहित बहिणी, १ भाऊ बी.ई. शिकत आहे. **अपेक्षा** : जन्म १९७० पूर्वी नसावा. कोकणस्थ, उंची किमान ५'-९''. मध्यम बांधा. इंजिनियर, सी.ए., नेव्ही ऑफिसर, नोकरी वा व्यवसाय चालेल. **संपर्क** : क्र. ४/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

**क्र. ५/१९९९ वधू** : बी.कॉम. डी.बी.एम्. बरोज वेलकम स्टेनो सेक्रेटरी, जन्म ११.९.१९६५, उंची ४'-१०'', रंग गोरा, गोत्र-कपि, रास कुंभ, गण मनुष्य, रक्तगट ए आरएच निगेटिव्ह, वडील नाहीत. आई, १ भाऊ, १ बहिण. **अपेक्षा** : अनुरूप, शिक्षण, नोकरी, जागा हवी. लग्न साधे करण्याची इच्छा. संपर्क : क्र. ५/१९९९, द्वारा संपादक, हितगुज.

**क्र. ६/१९९९ वधू** : जन्म २७.१२.७२,

## शिपायापेक्षा मंत्री होणे सोपे!

प्रथमच निवडून आलेल्या आमदारांची मंत्री म्हणून नियुक्ती झाली. माझी मंत्र्यांशी चांगली ओळख असल्यामुळे त्यांनी माझी खाजगी सचिव म्हणून नेमणूक करून घेतली. मंत्र्यांना भेटावयास येणाऱ्या लोकांची मंत्री महोदयांशी गाठ घालून देणे हे महत्त्वाचे काम माझ्यावर होते.

पहिल्याच दिवशी आमच्या गावचे एक खेडूत एका १८ वर्षाच्या मुलाला घेऊन आले. त्यांनी मंत्र्यांना एकच विनंती केली, ''ह्या मुलास कसेही करून नोकरी लावून द्या.'' मंत्र्यांनी त्याचे शिक्षण विचारल्यानंतर तो ८वी पास असल्याचे सांगण्यात आले.

मंत्र्यांनी मला ताबडतोब त्या मुलास आमच्याच कार्यालयात शिपाई म्हणून घेण्यास सांगितले. मला खात्री होती की मंत्री अशी नेमणूक करू शकत नाहीत. अशी नेमणूक भरती खात्यातर्फेच करावी लागते. ती मंडळी गेल्यावर जेव्हां मी हे त्यांच्या निदर्शनास आणले तेव्हा 'मला एक शिपाईसुद्धा घेता येत नाही का?' असा वैतागून प्रश्न केला.

एक परिवहन महामंडळ आमच्या खात्याच्या अखत्यारीत येत असल्याचे मंत्र्यांच्या लक्षात आले. त्यांनी मला लगेच त्या महामंडळाच्या अध्यक्षांना फोन करुन ह्या मुलास कंडक्टर किंवा तत्सम नोकरी देण्याचा निरोप देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी अध्यक्षांना फोन केला. परंतु त्यांनी त्यांची असमर्थता व्यक्त केली. कारण त्यांच्या नियमाप्रमाणे कंडक्टर कमीतकमी पदवीधर असावा लागतो व शिपाई कमीतकमी १२वी पास लागतो.

ही माहिती मी मंत्र्यांना सांगितल्यावर ते आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''याचा अर्थ ह्या मुलास आपण कोणतीही सरकारी नोकरी देऊ शकत नाही.''आणि हसत हसत पुढे म्हणाले, ''यापेक्षा मंत्री होणे सोपे की!''

माझ्या माहितीप्रमाणे मंत्रीमहाशय फक्त १०वी पर्यंत शिकलेले होते. एस.एस.सी. अॅपीअर्ड! पण पास नव्हे!!

**- सुरेश सखाराम** (पृ. ३९९), मुंबई.
अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान



Marathe Pratishthan

बी.कॉम., एल.एल.बी. चालू, उंची ४'-१०'', रक्तगट ए आरएच पॉझिटिव्ह, वर्ण निमगोरा, सडपातळ, सामाजिक कार्याची आवड, नोकरीची खास आवड नाही. वडील गोव्यात बागायत शेती, दुकानदारी, सार्वजनिक कार्यकर्ते. **अपेक्षा :** धंदेवाला किंवा नोकरीवाला, मुंबई, पुणे, सांगली, मिरज इत्यादी गावी चालेल. **संपर्क :** क्र. ६/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

**क्र. ७/१९९९ वधू :** जन्म ११.१२.७४, कॉम्प्यूटर इंजिनियर, उंची ४;-१०'', रक्तगट ए आरएच पॉझिटिव्ह, वर्ण गोरा, सुस्वरूप, प्रायव्हेट कंपनीत नोकरी, गोव्यात. वडील गोव्यात बागायत शेती व दुकानदारी, सार्वजनिक कार्यकर्ते. **अपेक्षा :** शक्यतो कॉम्प्यूटर क्षेत्रात, धंदा अगर नोकरी. भारताबाहेर जाण्याची मानसिक तयारी. **संपर्क :** क्र. ७/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

**क्र. ८/१९९९ वर :** अमेय अनंत बक्षी, बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स, जन्म ६.९.१९७१, उंची ५'-८'', वर्ण निमगोरा, मंगळ नाही, देशस्थ-ऋग्वेदी , गोत्र श्रीवत्स, अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनियर (दरमहा ४५०० डॉलर) डिसेंबर ९९ मधे भारतात येणार (सुट्टीवर) अपेक्षा : अनुरूप, उच्चशिक्षित. **संपर्क :** अनंत ल. बक्षी, सी-१९, सुयोग सोसायटी, संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१. फोन : ५६९२३४८.

**क्र. ९/१९९९ वधू :** मुग्धा राजीव मराठे, बी.एससी. (कॉम्प्यूटर सायन्स) पुणे विद्यापीठ, ॲप्टेक मधून ॲडसेट (ॲडव्हान्स डिप्लोमा इन सॉफ्टवेअर एक्सपोर्ट टेक्नॉलॉजी), जन्म १४.६.७६, उंची ५'-५¾'', करिअर व कौटुंबिक जीवन यामधे योग्य समन्वय साधू इच्छिते. कौटुंबिक पार्श्वभूमी - गेल्या तीन पिढ्यांपासून इचलकरंजी व मिरज येथे मराठे कुटुंबीय कापडधंद्यात लोकांचा विश्वास व प्रेम संपादन करून आहेत. **संपर्क :** श्रीमती मेधा राजीव मराठे (आई), मराठे बंगला, प्लॉट नं. ९०, लक्ष्मी प्रोसेस जवळ, इचलकरंजी ४१६११५. फोन : ४३२३८४, ४३५०२२.

**क्र. १०/१९९९ वधू :** वंदना रामचंद्र नाईक, बीएस्सी, एमए, एलएलबी, एसीएस, जन्म - १९.६.१९५९, गोत्र गौतम, देशस्थ यजुर्वेदी, उंची ५-२'', धारीवाल इंडस्ट्रीज लि. मधे कंपनी सेक्रेटरी मा. उ. १५,०००. वडील नाहीत, आई, दोन भाऊ व एक बहिण (विवाहित) **अपेक्षा :** सीए किंवा इंजिनियर (सिव्हिल नको) पुण्यातला, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेचा. **संपर्क :** श्रीमती सरोज रामचंद्र नाईक, सेक्टर नं. ९१/२, प्लॉट नं. ३३, आशा निकेतन अपार्टमेंट, ५ कृष्णा कॉलनी, आर. पी. नगर ११, कोथरूड, पुणे ४११०३८. फोन - ३३३५९९. (सौ. नीलांबरी रमेश, पृ. २८० यांचेमार्फत.)

**क्र. ११/१९९९ वर :** दीपक रत्नाकर भोगले, बी.कॉम., खाजगी नोकरी मा.उ. ३००० रु. जन्म - २८.९.६९, उंची ६', गोत्र शांडिल्य, कोकणस्थ. आई व दोन विवाहित बहिणी. **अपेक्षा :** कोकणस्थ, नोकरीची अट नाही. **संपर्क :** श्रीमती शकुंतला रत्नाकर भोगले, 'आनंद', ब्राह्मण गल्ली, बेगमपुरा, औरंगाबाद ४३१००१. (सौ. नीलांबरी रमेश, पृ. २८० यांचेमार्फत.)

**क्र. १२/१९९९ वर :** उदय गणेश (पृ. २७४), बी.कॉम., फायनान्स कंपनीत नोकरी. मा. उ. ७००० रु. जन्म - ३१.७.७१, उंची ५'११''. आई, १ विवाहित बहिण व एक लहान भाऊ (नोकरी करणारा) **अपेक्षा :** पदवीधर, नोकरी करणारी, ब्राह्मण. **संपर्क :** श्रीमती पद्मजा गणेश मराठे, २०१ शनिवार पेठ, गोखले वाडा, पुणे ४११०३०. (सौ. नीलांबरी रमेश, पृ. २८० यांचेमार्फत.)

★★★

## वेडं मन

वेडं मन आज मोकाट सुटलं होतं
काही केल्या जमिनीवर परतत नव्हतं
स्वप्नातही शक्य नाही ते करायला धावत होतं
केव्हापासून माहीत नव्हतं
पण वेडं मात्र नक्की झालं होतं ॥१॥
आकाशात झेप घेऊ इच्छित होतं
लहान आहोत हे मानायला तयार नव्हतं
काही केल्या थाऱ्यावर येत नव्हतं,
कारण ते आज वेडं झालं होतं ॥२॥
जगात गाजू असं स्वप्न पहात होतं
पण ते अजून गल्लीतही ओळखीचं नव्हतं
का कुणास ठाऊक, एकदमच
अणुहून लहान होऊ इच्छित होतं
कारण ते पूर्ण वेडं झालं होतं ॥३॥

- **सारिका भास्कर**, वाडा
(पृ.२० दत्तात्रेय विष्णु यांचा मुलगा भास्कर यांची कन्या)

## 'स्वयंवर' वधू-वर सूचक मंडळ

**- सौ. अरुंधती अविनाश,** औरंगाबाद
(पृ. १८७, अविनाश दिगंबर यांची पत्नी)

विवाहाच्या गाठी स्वर्गातच ब्रह्मदेवाने बांधलेल्या असतात. आपण फक्त 'माध्यम' असतो. माध्यमाची भूमिका म्हणून स्वयंवर वधू-वर सूचक मंडळ इमाने इतबारे काम करीत आहे.

औरंगाबादेतील एम. ३, चेतनानगर येथे आमच्या राहत्या घरी विवाह सूचक मंडळ आपल्या संस्थेअंतर्गत सन १९९५च्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू केले. संस्थेत मुलींची नोंदणीची संख्या सुमारे ६०० आहे. मुलांची संख्या ४००च्या घरात आहे.

या संस्थेची कार्यपद्धती निश्चितच वेगळी आहे. आपल्या पाल्याचे लग्न लवकर व योग्य ठिकाणी जमावे यासाठी पालक या संस्थेकडे धाव घेतात. या संस्थेत प्रवेश घेतांना मुलां-मुलींकडून एक फॉर्म भरून घेण्यात येतो. यामधे त्यांची वैयक्तिक संपूर्ण माहिती भरून घेण्यात येते. उदा. रक्तगट, कौटुंबिक माहिती, नोकरी, अनुवांशिक त्रास, शारीरिक व्यंग इ. असल्यास कुंडली देणे आवश्यक असते. या सर्व गोष्टींवरून मुला-मुलींची अनुरूपता संस्थेतच पडताळून पाहण्यात येते.

बाहेरगावी मुलांच्या पालकांकडे अनुरूप माहिती पाठविली जाते. होकार किंवा नकार कळवतात. होकार असेल तरच मुलींच्या पालकांना स्थळ म्हणून दिले जाते. त्यामुळे मुलींच्या पालकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचतात.

सध्याच्या महागाईच्या काळात ही संस्था वधू-वर पालकांकडे नाममात्र शुल्क आकारते. कारण संबंधित कार्यवाही करण्यासाठी लागणारा खर्च निःशुल्क करणे कठीण आहे. संस्थेच्या या अभिनव उपक्रमामुळे मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही तसेच सातासमुद्रा पलिकडे लग्ने जमविण्यात ही संस्था यशस्वी झाली आहे. ती संख्या सुमारे २००च्या जवळ आहे.

काही विशिष्ट बाबतीत मुला-मुलींच्या अडचणी समजून घेऊन त्यांना विनामूल्य सल्ला देण्यात येतो. तसेच सद्यपरिस्थितीतील व बदलत्या काळातील गरजा लक्षात घेऊन मुला-मुलींची मानसिक तयारी करून घेण्यात येते.

★★★



Marathe Pratishthan

# जपानमध्ये वेगळं काय आहे?

**यशवंत लक्ष्मण**, (पृ. १०१), विंग कमांडर (निवृत्त), पुणे

मुंबईच्या शिवाजी विमानतळावरून सिंगापूर एअर लाईनच्या बोईंग ७४७ विमानात गेल्यापासून वेगळ्या पण सुंदर दुनियेत प्रवेश केल्याचं अनुभवलं. जपानच्या कानसाई विमानतळावर उतरल्यावर तर खात्रीच पटली. सतत एक-एक गोष्ट आश्चर्यचकित करीत होती व हाच अनुभव वारंवार जपान सोडेपर्यंत येत राहिला.

स्वच्छ प्रशस्त रस्ते, कार, बसेस, ट्रेन्स, सर्वच नवी कोरी वाटणारी वाहनं, झगमगाट करणारी स्टोअर्स, मोठ्या निवासी इमारती, बंगले - नव्याने रंग दिल्यासारखे - सुंदर आकाराने कापलेली लहान-मोठी झाडे व जिकडे तिकडे फुलंच फुलं पाहून मन मुग्ध होत होतं. उत्तम पेहरावातल्या हसतमुख स्त्री-पुरुष, मुलं, मुली पाहून तिथला समाज किती सुखी आहे याची कल्पना येत होती. अदबशीरपणे व परक्याला आपलं काम सोडून मदत करणारे हे लोक समभाव व परस्परांबद्दल प्रेमाचा प्रत्यक्ष पुरावाच देत होते.

पूर्ण मुक्कामात कोठेही कागद, प्लॅस्टिक किंवा इतर कचरा दिसला नाही. मोठे रस्ते किंवा गल्ल्यांच्या दोन्हीही बाजूला बंद ड्रेनेजेस आहेत. कोठेही पाणी साचलेले आढळत नाही. वीज, पाणी पुरवठा नेहमी अखंड चालू असतो. वाहनांचा वेगवाग ओघ हॉर्नच्या गरजेशिवाय चालतो. नियमांचं कठोरपणे पण आनंदाने पालन करणारे लोक त्यांच्या शिस्तप्रियतेमुळे थक्क करतात.

टोक्यो हे जगात सर्वात मोठे शहर आहे. सर्वच इंजिनियरिंग क्षेत्रात हे राष्ट्र अग्रगण्य आहे. जगातील सर्वात उंच व सर्वात लांब सस्पेंशन पूल येथेच आहे. जगात सर्वात मोठे GIANT WHEEL येथेच आहे. टोक्योचं टॉवर फ्रान्सच्या एफेल टॉवरपेक्षा १०० फूट जास्त उंच आहे. भरसमुद्रात अत्यंत अद्ययावत असं कानसाई इन्टरनॅशनल एअरपोर्ट येथेच आहे. साधारण ५ मैल पुलांनी ते किनाऱ्याला जोडले आहे. एक्सप्रेस वे, दुमजली उड्डाण पूल, एका खाली एक असे ३ रेल्वे ट्रॅक्स व ३०० मैलापेक्षा जास्त वेगाने धावणारी बुलेट ट्रेन, जगात सर्वात मोठी बौद्ध मूर्ति व सर्व पुरातन इमारती पूर्ण डागडुजी व रंगरंगोटी करून ठेवणं येथेच शक्य आहे.

सर्व पर्यटन स्थळे, स्टेशन्स व इतर गर्दीच्या ठिकाणी, रस्त्यांवर ठराविक अंतरावर, स्वच्छता-गृहे, जागोजागी कागद व रिकामे डबे-बाटल्या टाकायला कचरा पेट्या. सर्वजण निमूटपणे कागद, कचरा या पेट्यातच टाकतात. डास व कीटकांचा अभाव दिसतो. ते आपल्याला आश्चर्यकारकच वाटतं.

बस स्टॉपस् वर प्रत्येक रूटचं वेळापत्रक असतं. त्याचप्रमाणे एका चौकोनी खांबावर प्रत्येक रूटनंबरपुढे ५-६, बोटाच्या पेराएवढ्या खिडक्या असतात. स्टॉपपासून बस १५ मिनिटे दूर असल्यापासून बसचं चित्र एक-एक खडकी पुढे सरकताना दिसतं व २ मिनिटं राहिली की मंजूळ बेल ऐकू येते. आपण लाईनवर उभं राहिलं की बसचं काचेचं दार बरोबर आपल्या समोर येऊन उघडतं. बस मध्ये उत्तम कार्पेट असते व मखमली सीटस् असतात. उतरताना समोरच्या दारावर इलेक्ट्रॉनिक साईनबोर्डवर त्या स्टॉपचं भाडं दाखवलेलं असतं. पैसे टाकले की बाकी चेंज आपोआप येते व 'थँक यू' अशी अक्षरं येतात. ड्रायव्हर रुबाबदार गणवेशात असतो. टाईम टेबल प्रमाणे बस येईल ही खात्रीच.

जपानमध्ये रेल्वेच व्यापक जाळं आहे. त्यामुळे बरीच स्टेशने ही जंक्शन्स आहेत. बुलेट व इतर २-३ प्रकारच्या रेल्वेज आहेत. बरेच भुयारी मार्ग आहेत. खालीवर जाण्यासाठी एस्कलेटर्स आहेत. निरनिराळ्या रेल्वेजची टाईम टेबल्स वेगळ्या रंगात असतात. तिकीट घेण्यासाठी मशिन्स असतात. प्लॅटफॉर्मवर जाण्याकरता असणाऱ्या मशिनमध्ये तिकीट टाकलं कि, ते चेक होऊन क्षणार्धात बाहेर येतं. प्रवास संपला की, बाहेर पडताना तशाच मशिनमध्ये तिकीट टाकलं की ते बाहेर येत नाही.

## जपानमधील काही अनोखे अनुभव

क्योटो इंटरनॅशनल सेंटरमधील थियेटर मध्ये जपानी मुलींनी ३ तासांचा उडीसी नृत्याचा उत्कृष्ट कार्यक्रम दिला. मुद्रा समजावून प्रेक्षकांना सहभागी केलं. १५-२० मुलींनी हौसेनं साड्या नेसवून घेतल्या व सर्वत्र आनंदी वातावरण निर्माण झालं.

एका जंक्शनवर माझ्या नातीने एस्कलेटर व ऑटोमॅटिक तिकीट मशिनच्या नादात १२ हजाराचा पेन्टॅक्स झूम कॅमेरा कोठतरी ठेवला. हे २ ट्रेन्स बदलल्यावर शेवटच्या स्टेशनबाहेर येताना रात्री १० वाजता लक्षात आलं. कपाळाला हात लावण्याची वेळ आली होती. पण एक प्रयत्न म्हणून आम्ही स्टेशनवरील एका कर्मचाऱ्याला हे सांगितलं. त्याने कॅमेराचं वर्णन लिहून घेतलं व फोन केला. ३ मिनिटात कॅमेरा जमा केल्याचं सांगितलं. दुसऱ्या दिवशी जाऊन कॅमेरा घेतला.

एकदा मुलं पार्क मध्ये गेली असता तिथून गंमत म्हणून खूप स्टोअर्समध्ये 'विंडोशॉपिंग' करून आली. २ तासांनी परतल्यावर कोठेतरी एक जॅकेट व स्कार्फ हरवल्याचं समजलं. आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या पूर्ण मार्गाची उजळणी केली. जॅकेट रस्त्यावरच एका बाजूला ठेवलेलं मिळालं तर स्कार्फ एका डिपार्टमेंट स्टोअरच्या ४थ्या मजल्यावर लॉस्ट/फाऊंड वस्तूत ठेवलेला आढळला.

एका अमेरिकन स्त्रीची पर्स हरवली होती. रिपोर्ट करणं किंवा शोधण्यात अर्थ नाही असं तिनं गृहीत धरलं होत. २-३ दिवसांनंतर अशी गोष्ट पोलिसांना कळवायलाच लागते असा नियम असल्याचं तिला कोणीतरी सांगितलं. त्या जवळच्या पोलिस स्टेशनवर गेल्या तेथे पोलिसांनी थोड्या वेळातच एक पत्ता दिला. तेथील बऱ्याच सामानातून ही पर्स शोधल्यावर पूर्ण पैसे शाबूत असल्याचा आनंदाचा धक्का तिला बसला.



Marathi Pratishthan

# प्रायश्चित्त

- विनायक केशव (पृ. २०), वरळी, मुंबई

***लग्नातल्या माझ्या पोशाखाबद्दल लोक आडून हसत होते. पण मी मात्र अगदी सुखावून गेलो होतो. बाबांच्या पगडीला मी न्याय देत होतो. बाबांना दुखावल्याचं मी प्रायश्चित्त घेत होतो.***

अगदी परवाची गोष्ट. आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या आणि डोअरबेलनी भोकांड पसरलं. रंगाचा बेरंग झाला. मी कोचावरून तसाच धडपडत उठलो. टी पॉयचा कोपरा बाजूला केला आणि दरवाज्याकडे झेप घेतली. टी पॉयवरच्या कपबश्या धडपडल्या आणि बाजूला बसलेल्या मावशीच्या मांडीवर गरम गरम चहा सांडला. बिचारीला चांगलाच चटका बसला. तिच्या डोळ्यातून चटकन पाणी आलं. बेल वाजवणाऱ्या फालतू विक्रेत्याला वाटेला लावून मी मागे फिरलो. मावशीची मांडी चांगलीच पोळली होती. अगदी अजाणता घडलेल्या या चुकीबद्दल मी त्यानंतर बराच बचैन होतो. आपल्याकडून या नाही त्या तऱ्हेनी माणसं दुखावली जातात शरीरानी वा मनानी. कधी आपण सीरीयसली घेतो, कधी विसरून जातो. धनुष्य बाणाला विसरलं तरी लक्ष्यभेद होतोच.

माझ्या लहानपणातली घटना. त्यावेळच्या तरुण पिढीचा काचा मारलेलं धोतर, ओपन कॉलरचा शर्ट, आखूड कोट आणि तिरपी टोपी हा पोशाख होता. जुन्या पिढीतले लोक धोतर, सदरा, लांब कोट, उपरणं, रुमाल किंवा प्रसंगविशेषी पगडी घालीत. आमच्या कुटुंबात मी, आई आणि बाबा. त्यावेळच्या मानाने अगदीच छोटं कुटुंब. माझ्या जन्माच्या वेळी आई बाबा उतारवयाकडे झुकले होते. फार उशिरा मूल झालं होतं. बाबांचा पोशाख जुन्या पद्धतीचा असे. एकदा मी चौपाटीवर जाण्याचा हट्ट बाबांजवळ धरला. हो ना करता बाबा तयार झाले. आम्ही मोठ्या ऐटीत व्हिक्टोरियातून चौपाटीवर गेलो. तिथे चणे, कुरमुरे विकणाऱ्या भय्याबरोबर बाबांची बोलाचाली झाली. भय्या बाबांकडे तिरपी नजर लावून 'बुड्ढा' म्हणाला. मला त्याचा अर्थ समजला नाही. पण ही शिवी असावी किंवा वाईट शब्द असावा एवढं मात्र समजलं. घरी गेल्यावर मी आईला विचारलं. तिलाही नीटसं सांगता आलं नाही. मग आमच्याकडे दूध आणणाऱ्या रामशरण भय्याला विचारलं. त्याने निरनिराळी उदाहरणं देत 'बुड्ढा' म्हणजे म्हातारा हा अर्थ माझ्या गळी उतरवला.

त्या लहान वयातही कोण जाणे पण आपले बाबा म्हातारे आहेत हे मला मुळीच आवडत नसे आणि त्या प्रसंगापासून तर मी बाबांबरोबर कुठेही जायला नाखूष झालो होतो.

आमच्या परीक्षेचा रिझल्ट लागला. मी पहिल्या नंबराने पास झालो. आमचे गुरुजी छोटासा समारंभ आखीत आणि मुलांच्या पालकांना बोलावीत. गुरुजींनी बाबांसाठी तयार केलेली आमंत्रण पत्रिका माझ्याजवळ दिली. मी ती आईजवळ दिली आणि म्हटलं 'आई, तू ये आमच्या शाळेत. बाबा नकोत.'

'अरे पण, पत्र ह्यांच्या नावाचं आहे ना? मग मी कशी चालेल? आणि बाबा का नकोत? ते म्हणाले कां तसं?'

'मी बाबांना सांगणारच नाही. तू ये म्हणनो ना'

'अरे पण बाबा का नकोत?'

मी तोंड बंद ठेवलं.

पुन्हा पुन्हा आई विचारत होती.

शेवटी चिडून म्हणाली, 'आपल्यासाठी जिवाचं रान कोण करतं? स्वतः जुने कपडे घालून आपल्याला नवे कपडे कोण देतं? तुझे सगळे लाड कोण पुरवतं? सांग, सांग ना?'

मी खाली मान घालून उभा होतो.

आईचा राग अनावर झाला. तिनं भराभर दोन चार कानशिलात लगावल्या. माझा चेहरा लालबुंद झाला. स्फुंदत स्फुंदत मी म्हटलं,

'आई , इतर मुलांचे बाबा किती चांगले कपडे घालनान. किती छान दिसनात ने? आणि आपले बाबा....'

'आपले बाबा काय कपडे घालीत नाहीत?'

'पण ने अगदी जुने घालनान. डोक्याला टोपी घालीन नाहीत. मला नको असले बाबा.'

'बाबल, फार शेफारला आहेस तू. बाबा नाही येत आणि मी सुद्धा येत नाही. तू एकटाच

***जपानमध्ये वेगळं काय आहे* - मागील पानावरून**

फक्त 'थँक यू' अक्षरं दिसतात. अगदी खालच्या भुयारी स्टेशनवर सुद्धा हॉटेल्स, कारंजी, फुलझाडं व दिव्यांचा झगझगाट असतो.

जपानमध्ये मोठी शेती दिसत नाही. छोट्या-छोट्या प्लॉटस्वर फळभाजी व फूलशेती दिसली. प्रत्येक रोप, फळ, फूल प्रदर्शनात ठेवतात तसं परिपूर्ण! प्रत्येक रोपाला लहान मुलांप्रमाणे वाढवतात. सर्व भाजी एका क्वालिटीची! मशीनने तयार केल्याप्रमाणे! सर्व दुकाने, अगदी दूर खेड्यात सुद्धा, एअर कंडीशन्ड व व्हेंडींग मशीन असलेली, भाज्यांच्या पाकिटावर सुद्धा बार कोड असलेली पाहून नवल वाटतं. प्रत्येक खोलीत स्प्लीट युनिट-ए.सी. असतोच. घरासमोर व दुकानासमोर फुल झाड. असं हे जपान!

हे सर्व चांगलं असताना महागाईचं गालबोट मात्र आहे. दूध ६० रु. लिटर, सर्वच वस्तू ७ ते ८ पट महाग. ड्रेसेस ३० हजार रु., ५० मैलावरील ओसाका विमानतळाला जायला प्रत्येकी १२०० रु. लागले. टोक्योला जायला बस भाडं २००० रु., व डिस्नेलँडचं तिकीट २२०० रु. बुलेट ट्रेनचं कमीत-कमी भाडं ६०० रु. वगैरे सतत पैशाची चिंता हिशेब करायला लावते. मात्र थोड्याच दिवसात बस तिकीट ७० रु. कमीत कमी असलं तर स्वस्त वाटायला लागतं.

या सुंदर लोकांच्या सुंदर देशात नव्या बरोबर जुनी संस्कृती अभिमानाने जोपासलेली आढळते. ५० वर्षात अमेरिकेला मागे टाकणाऱ्या या देशाने पाश्चिमात्यांच्या फक्त चांगल्या गोष्टी उचलल्या आहेत.

या सर्व आठवणींची उजळणी झाली की, परत जपानला जाण्याची संधी मिळावी असच वाटतं.

★★★



Marathe Pratishthan

जा शाळेत. थांब घरी येणं झालं की सांगते त्यांना.'

बाबा संध्याकाळी खुषीतच घरी आले. आल्याबरोबर हातातलं पुडकं आईच्या हातात देत ते म्हणाले 'तुम्ही म्हणता ना माझे कपडे जुने झालेत म्हणून? हा बघ अंगरखा नवीन शिवून आणला आहे. पगडी आणि उपरणंसुद्धा नवीन घेऊन टाकलं. बाबलचे गुरुजी परवा भेटले होते. पुढल्या सोमवारी समारंभ आहे त्यांच्या शाळेत. मला आमंत्रण दिलय. बाबलसुद्धा माझे जुने कपडे आवडत नाहीत. म्हणून मुद्दाम नवीन आणलेत. गुलाम आहे टिचभर, पण आवडी निवडी अगदी मोठ्या माणसासारख्या.'

त्यानंतरचा संवाद मी ऐकला नाही. पण एवढी तयारी करून सुद्धा बाबा समारंभाला आले नाहीत, आणि त्यानंतर कोणत्याच समारंभाला मी बाबांबरोबर गेलो नाही. कारण पुढच्या वर्षाच्या समारंभाच्या आतच बाबा अचानक आम्हाला सोडून कायमचे गेले.

आईने बाबांच्या इतर वस्तू वाटून टाकल्या पण नवीन पगडी आणि उपरणं अगदी जपून कपाटात ठेवलं.

त्यानंतर मी यशाचे अनेक टप्पे गाठले. अनेक बक्षीस समारंभाला सन्मान करवून घेतले. पण प्रत्येक वेळी मी कपाट उघडून बाबांची पगडी आणि उपरणं हृदयाशी कवटाळून अगदी लहान मुलासारखा रडत असे. बाबांचा अपमान मी केला पण मी लहान होतो. मला पोच नव्हती. झालेली चूक सुधारण्याची संधीच देवाने मला दिली नाही. याचं मला मोठं दुःख होत असे. बाबांनंतर आईने सगळे कष्ट उपसून माझं शिक्षण केलं. मी खूप शिकलो. त्याच्या जोरावर लहान वयात सन्मानाची, मोठ्या हुद्द्याची नोकरी मिळाली.

माझे दोन्ही मामा माझ्या लग्नासाठी आईच्या पाठी लागले. परिस्थिती साधारण असली तरी मोठ्या पगाराची आणि मोठ्या हुद्द्याची नोकरी बघून मोठ्या घरच्या मुली सांगून येऊ लागल्या.

शेवटी एक स्थळ पसंत पडलं. मुलगी नक्षत्रासारखी होती. आमच्या मानाने मोठ्या घरची होती. लग्नाची बैठक बसली. माझे दोन्ही मामा शेजारचे रामभाऊ गोखले, बैठकीला होते. होकाराचा शब्द देण्यापूर्वी माधवमामा मला घेऊन स्वयंपाकघरात गेला. तिला आई, दोन्ही माम्या होत्या. माधवमामा सहज म्हणाला 'गोदूताई' या समारंभाला केशवराव हवे होते. बाबल त्यांचा लाडका होता हो. इतका वेळ आवरून ठेवलेला बांध फुटला आणि आई मुसमुसून रडू लागली. 'माधवा, हौशीने नवीन कपडे आणले. पगडी आणली. पण घालणं काही झाली नाही हो. सगळं इथच टाकून गेले. कपाटात अजून जपून ठेवली आहे हो.'

आम्ही बैठकीत परत आलो. सगळं काही निश्चित झालं. पेढ्यांचं बॉक्स मुलीकडच्या माणसानी पिशवीतून बाहेर काढलं. का कोणास ठाऊक मी चटकन म्हणालो, 'हे पहा, माझी फक्त एकच अट आहे.'

'एकच काय, वसंतराव दहा अटी घाला आम्हाला मान्य. पण अगोदरं हे पेढे घ्या.' माझे होणारे सासरे हसत हसत माझ्याकडे झेपावत म्हणाले,

'अहो पण अट तर आधी ऐका.'

'बोला काय अट आहे?'

'लग्न लागताना बोहल्यावर मी डोक्यावर पगडी आणि अंगावर उपरणं घेऊन चढणार आहे कबूल?'

'जवळ जवळ सारेजणच हसले. त्यांना चेष्टाच वाटली.'

'वसंतराव, हा विनोदच आहे ना?'

'नाही, विनोद नाही. माझी अट ' पाहिजे तर मुलीला विचारा आणि मग पुढचं ठरवा.

'अहो, पण तिथं मोठमोठी माणसं जमणार. आता पगडी उपरण्याचे दिवस गेले वसंतराव.'

आता टोपीसुद्धा कोणी डोक्यावर घालीत नाही. सूट गेले. आता सफारीचा जमाना आहे, भावी सासरे माझी समजूत घालीत होते. दोन्ही मामा त्यांच्या मदतीला धावले. पण मी मात्र माझाच हट्ट धरून बसलो. विशेष म्हणजे आमच्या भावी सौ. नी नापसंती तर सोडाच पण माझी कल्पना उचलून धरली.

लग्नामध्ये माझ्या या पोशाखाबद्दल लोक आडून हसत होते. मला ते जाणवत होते. पण मी मात्र अगदी सुखावून गेलो होतो. बाबांच्या पगडीला मी न्याय देत होतो. बाबांना दुखावल्याचं मी प्रायश्चित्त घेत होतो. ★★★

## वृक्षाचे मनोगत

**सौ. मानसी सचिन,** पोमेंडी, रत्नागिरी
(पृ. ४६ - सचिन सुधाकर याची पत्नी),

झाडाला आकार देण्यासाठी
खूपदा त्याला छाटलं
आकार चांगला आल्यामुळे
मला सुख वाटलं

पण एकदा झाड म्हणालं
अग तुझ्या सुखासाठी
माझं दुःख फांदाफांद्यातून गोठलं
आता तरी मला जरा फुटवा येऊ दे
अन् मनाप्रमाणे माझ्या लेकरांना
स्वतंत्रपणे मलाच वाढवू दे

खरचं सांगतो, नाही ऐकलंस माझं
तरी डूक मी ठेवणार नाही
तुला गारवा मिळण्यासाठी
सावलीला डावलणार नाही
तुझ्यासाठी जगण्याचा
आटोकाट प्रयत्न करीन
अन् नाही उरली गरज माझी
तर न डगमगता, तुझ्याचसाठी
हळूच उन्मळूनही पडेन

## शरद ऋतु

**श्रीमती मीनाक्षी अंकलीकर,** शीव, मुंबई.
(पृ. ६९८, अ. धों. खांबेटे यांची बहीण)

शरद ऋतूची शान आगळी
मोहविते मन सांज सकाळी ।
कोमल कुसुमें मधुप परागी
झुलवित बसले पंख रुपेरी ॥
पुनवेचा हा चंद्र नवा
निशिगंधाची धुंद हवा ।
संगमरमरी वसुंधरेवर
पिठुर चांदणे सुखवि जिवा ॥
झुळझुळ वारा वाहे शीतल
रातराणिचा मादक दरवळ ।
चोहिकडे भरला आनंद
वाजवि मुरली गोविंद ॥



Marathi Pratishthan

चिंतन

# जीवनाचे सार्थक

**मीननाथ लक्ष्मण** (पृ. २८०), पुणे

प्रत्येक मनुष्यमात्राने पाच प्रश्नांचा विचार करावा - (१) आपण कोण आहोत? (२) आपल्या देहामध्ये चैतन्य कोठून आले? (३) आपण झोपल्यावर आपोआप उत्साहित होऊन कशामुळे उठतो? (४) आपले मूळ स्वरूप नक्की कोणते? (५) शास्त्रांना अगम्य असे मन, चित्त, बुद्धी याची निर्मिती कशातून झाली?

या जन्मानंतर मृत्यू आला की सर्व काही संपले असे नाही, अन्यथा जगभरातील सर्वधर्मीय ज्ञानी, वंदनीय लोकांनी पुनर्जन्म आहे यावर विश्वास करुन आपापल्या पद्धतीनुसार पुढची सोय कशाला केली असती?

जर पुनर्जन्म आहे हे नक्की तर 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्' हे जन्ममरणाचे चक्र कशामुळे फिरत रहाते? बहुतांशी साऱ्या जन्मभरात अगदी थोडे सुखाचे क्षण मिळतात. बाकी सर्व केवळ दुःखदायकच असते. हे दुःख अगदी जन्माच्या आधीपासूनच सुरू होते. ते चिंता, व्याधी, म्हातारपण आणि शेवटी मृत्यूपर्यंत भोगावे लागते. यातील कोणतीही बाब आपण पूर्णपणे टाळू शकत नाही.

सर्व मानवी जीव जन्मल्यापासून दिवसांनी, वर्षांनी मोठे होत जातात तसे तसे त्यांच्या भोवतालचे जग, बाहेरची सृष्टी शाश्वत आहे, आपल्याला कायम उपभोगायला मिळाली आहे असे समजतात. काही केल्या इतर काही पटतच नाही. मग तो त्या उपभोगयोग्य वस्तूंच्या प्राप्तीसाठी काहीही करण्यास तयार होतो. त्या हव्यासापोटी त्याची झोप हरवते, चिंतेमुळे मानसिक स्वास्थ्य हरवते, कधी खरे हितचिंतकही दुरावतात, त्याचे हातून अनेक भली-बुरी कृत्ये घडतात. या सर्वांचा परिणाम 'जे पेराल ते उगवेल' या न्यायाने पुढच्या काळातील, जन्मातील दुःखभार सोसण्याची निश्चिती होते. एवढेत नव्हे तर साऱ्याच तीव्र इच्छांची पूर्तता या जन्मात शक्य नसल्याने निदान त्या भोगण्यासाठी पुनः जन्म मृत्यूचे चक्र चालू होते. कारण सर्वांच्याच सर्व इच्छा, वासना यांची पूर्ती होणे हे सुद्धा निसर्ग नियमानुसार फार आवश्यक आहे.

या सर्व सांगण्याचा अर्थ नोकरी, धंदा, संसार इ. करणे नाही असा मुळीच नाही. आपण जो धंदा, नोकरी इ. करत असू ती कर्तव्यभावनेने, प्रामाणिकपणे, सचोटीनेच करावा. ज्या गोष्टीमुळे इतरांचे नुकसान होईल त्या गोष्टी पूर्णपणे टाळाव्या. संत रामदासांनी सांगितल्याप्रमाणे 'आधी प्रपंच करावा नेटका' त्याबाबतची सर्व कर्तव्ये, आवश्यक गोष्टी प्राधान्याने कराव्या, मात्र 'नेटक्याच' कराव्या. हे सर्व स्वतःचाच पुढील त्रास टाळण्यासाठी करायचे आहे.

सर्व तऱ्हेचे उपभोग शक्य तेवढे मर्यादित ठेवावे. कारण उपभोग, वासना यांना अंतच नसतो. जे सहज करण्यासारखे नसेल ते न करता आल्याबद्दल मुळीच खेद, खंत, लाज बाळगू नये.

प्रत्येकाने थोडा वेळ तरी रोज आपल्या मूळस्वरूपाची आठवण ठेवून, चैतन्यस्वरूप ईश्वरीशक्तीचे, दैवताचे नामस्मरण तरी करावे. ते कधीही कुठेही केले तरी चालते. संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराज व जगद्‌गुरु तुकोबारायांनी हा अत्यंत सोपा, साधा व कर्मकांडापासून मुक्त असा नामस्मरणाचा मार्ग सांगितला आहे. नित्यनियमाने प्रार्थना करताना त्याच्याकडे फक्त कृपाआशीर्वाद मागावा म्हणजे संकटाच्या प्रसंगी या ना त्या रूपाने तो परमदयाळू परमेश्वर निश्चित मदत करील. अन्यथा केवळ संकट प्रसंगी त्याला स्मरून, नवससायास करून काय उपयोग? ★★★

हसरं हितगुज

**चालणारे प्रेत!** - **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर

एकदा टर्मिनसला बेस्टची बस उशीरा का पोचली याची चौकशी करण्यास एका बस इन्स्पेक्टरला सांगण्यात आले. त्याने चौकशी करून खुलासा केला "Bus was delayed because dead body was walking" साहेबांना मृत माणूस कसा चालत होता याचे कोडे पडले. क्षणभर विचार केल्यावर त्यांच्या लक्षात आले की ''प्रेतयात्रेमुळे बसला उशीर झाला'' असे इन्स्पेक्टरला म्हणायचे असावे!

## चारोळया

**कु. सायली सतीश** (पृ.५५३) पुणे
११वी ची विद्यार्थिनी

जीवन नावाच्या सागराला
मृत्यू नावाचा किनारा असतो
किनारा खूप छोटा असतो
पण... सागराचाच पसारा असतो

★★★

चुकून एकदा एका फळाची
जमिनीशी भेट झाली
कुठे होते त्याला माहिती
मृत्यूची आपल्या वेळ आली?

## अडगळीचं घर नव्हे, आनंदभुवन!

- **राजा मराठे** (राजाराम नारायण, पृ. २३५)
मालाड, मुंबई (फोन : ३६९९०००)

***हितगुजच्या मागील (सप्टें. ९९) अंकात वामन गणेश (पृ. ५०३), नेरूळ, यांनी 'वृद्धाश्रम म्हणजे गोंडस नावाचे अडगळीचे घर' असा 'अर्धा पेला रिकामा' छाप दृष्टिकोन मांडला होता. हे अडगळीचं घर 'आनंदभुवन' कसे करता येईल याबाबतचा हा सकारात्मक दृष्टिकोन.- संपादक***

वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या समस्या प्रत्येक समाजामध्ये थोड्याफार फरकानं समान आढळतात. अगदी सुरवातीपासून या बदलाकडे लक्ष दिलं तर अडगळीच्या खोलीत अडकवून घेण्याची जरूर नाही. जीवनाकडे अत्यंत निरोगीपणे पहाणारी व्यक्तीच वय झाल्यावर आनंदात राहू शकेल.

आपल्या शेजारपाजारी लक्ष टाकलं तर एक गोष्ट सहज ध्यानात येते. आयुष्याच्या उमेदीच्या काळात पोसलेला अहंकार, रोजच्या सवयी व त्या पुऱ्या करण्यासाठी फाजील अट्टाहास आपल्या घरातील माणसांची मनं दुखवायला कारणीभूत होतात. एकदा का ही मनं दुखावली की हा माणूस घरातच नकोसा होतो. यार्कारता कोणत्याही गोष्टीचा आग्रह न धरता आयुष्यात, उद्योगधंद्याच्या निमित्तानं आलेले बरे वाईट अनुभव सर्वांसाठी मोकळे ठेवले तर फायदाच होईल. असा पुरुष अथवा स्त्री, म्हातारपण आलं तरी घरच्यांना नकोसा होणार नाही. म्हणजेच पर्यायानं स्वतःचं घर आनंदभुवन करील. ★★★



Marathe Pratishthan

## या अंकात


१. **या युवकांना झालंय तरी काय?** ................................ पृ.१
शशांक श्रीधर

२. **मराठे कुलबांधवातला पहिला 'शेट्टी'** ..................... पृ.३

३. **१७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत** ............ पृ.४
विनायक केशव

४. **मला आवडलेली कविता - बुद्ध, सुबुद्ध, वृद्ध** .......... पृ.६
प्रेषक - वामन आत्माराम

५. **१९९८-९९ मधील परीक्षांतले बक्षीसपात्र विद्यार्थी** ..... पृ.७

६. **संगणकाची समस्या - Y2K** .............................. पृ.८
सुधीर कृष्णाजी चक्रदेव

७. **मतदान करणे कायद्याने बंधनकारक असावे** ............ पृ.९
हेमंत अरुण

८. **उमेदवार सूज्ञ व सुसंस्कारित असावे** .................. पृ.९
वसंत रावजी

९. **शिपायापेक्षा मंत्री होणे सोपे** ............................... पृ.१०
सुरेश सखाराम

१०. **विवाह सहाय्य** .............................................. पृ.१०

११. **वेडं मंन (कविता)** ......................................... पृ.११
सारिका भास्कर

१२. **जपानमध्ये वेगळं काय आहे** ............................ पृ.१२
यशवंत लक्ष्मण

१३. **प्रायश्चित (कथा)** ........................................... पृ.१३
विनायक केशव

१४. **वृक्षाचे मनोगत (कविता)** ................................ पृ.१४
सौ. मानसी सचिन

१५. **शरदऋतु (कविता)** ......................................... पृ.१४
श्रीमती मीनाक्षी अंकलीकर

१६. **अडगळीचं घर नव्हे, आनंदभुवन** ....................... पृ.१५
राजा मराठे

१७. **जीवनाचे सार्थक** ............................................ पृ.१५
मीननाथ लक्ष्मण

१८. **चारोळ्या (कविता)** ......................................... पृ.१५
कु. सायली सतीश

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.५), **खुषीपत्रे** (पृ.४,८,९), **अनुकरणीय** (पृ.४) आणि **हसरे हितगुज** (पृ.१५) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan